दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ गुरुवार, दि. २४ जुलै २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक २५४ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त विधान भवनात अभिवादन




मुंबई : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती आज बुधवार, दिनांक २३ जुलै, २०२५ रोजी विधान भवनात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी विधानपरिषदेचे सदस्य संजय खोडके, विधानसभेच्या सदस्या सुलभा संजय खोडके, महाराष्ट्र विधानमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे, सचिव डॉ. विलास आठवले, सचिव शिवदर्शन साठ्ये, उप सचिव विजय कोमटवार, उपसभापती यांचे खासगी सचिव अविनाश रणखांब, संचालक, वि.स. पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेले : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

'महाराष्ट्र नायक' कॉफी टेबल बुकचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्य प्रेरणादायी असून त्यांनी महाराष्ट्राला अल्पावधीत प्रगतीपथावर नेले, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाटचालीचा वेध घेणाऱ्या 'महाराष्ट्र नायक' या विशेष कॉफी टेबल बुकचे प्रकाशन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे हस्ते राजभवन येथे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांची कॉफी टेबल बुकची निर्मितीची संकल्पना अभिनंदनीय असल्याचेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

यावेळी विधानसभा अध्यक्ष ?ड. राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार कालिदास कोळंबकर, योगेश सागर, मंगेश चव्हाण, देवयानी फरांदे, अनुप अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात 'जलयुक्त शिवार अभियान' योजना राबवण्यात आली, ज्यामुळे २२,००० हून अधिक गावांमध्ये जलसुरक्षा प्राप्त झाली. तसेच, नागपूर-मुंबई शहरांना जोडणारा 'समृद्धी महामार्ग' हा भविष्यकालीन दृष्टीकोन असलेला प्रकल्प साकारला गेला. महाराष्ट्राने सेवा हक्क कायदा लागू केला आहे. त्यामुळेच 'आपले सरकार' ही तक्रार निवारण प्रणाली आणि सेवा हक्क कायदा नागरिकांना शेकडो सेवा घरपोच देत आहे, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, श्री. फडणवीस यांच्या गतिशील नेतृत्वाखाली, महाराष्ट्र २०१६ मध्ये देशात सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक (इअ) आकर्षित करणारे राज्य ठरले, जे देशाच्या एकूण गुंतवणुकीच्या जवळपास निम्मे होते. पायाभूत सुविधा क्षेत्रातील प्राधान्यामुळे मुंबई मेट्रोचे विस्तार प्रकल्प, 'अटल सेतू' सागरी पूल, तसेच शासकीय-खासगी भागीदारीद्वारे शहरी व ग्रामीण विकासाला चालना मिळाली. राज्यात सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने 'ग्रामीण सामाजिक परिवर्तन अभियान' आणि दुर्बल घटकांसाठी सीएसआरअंतर्गत प्रभावी उपक्रम राबवण्यात आले. महाराष्ट्रात लवकरच वाढवणमधील खोल समुद्रातील बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि जपान सरकारच्या साहाय्याने सुरू असलेली बुलेट ट्रेन योजना हे तीन ऐतिहासिक प्रकल्प साकारले जाणार असल्याचेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी जपान, सिंगापूर, जर्मनी व अमेरिका येथे महत्त्वाच्या राजनैतिक भेटी दिल्या, ज्यातून तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा व शाश्वत विकासात जागतिक भागीदारी निर्माण झाली. त्यांच्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम - दावोस' मधील सहभागामुळे महाराष्ट्राला जागतिक व्यासपीठावर मान्यता मिळाली, ज्यामुळे १५ लाख कोटी रुपयांहून अधिक सामंजस्य करार झाले. आणि १६ लाखांहून अधिक रोजगारनिर्मितीचा मार्ग मोकळा झाला. कधी काळी नक्षलवादग्रस्त गडचिरोली जिल्हा – आज 'स्टील डिस्ट्रिक्ट ऑफ इंडिया' म्हणून ओळखला जातो, या परिवर्तनाचे संपूर्ण श्रेय श्री. फडणवीस यांना जात असल्याचेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

राजकीय जीवनापलीकडे, श्री. फडणवीस एक मूल्यप्रिय, कुटुंबवत्सल, आध्यात्मिक आणि विचारशील व्यक्तिमत्त्व आहे. राज्यातील कोट्यवधी महिलांच्या जीवनात 'माझी लाडकी बहिण योजने'च्या माध्यमातून एक कोटींहून अधिक महिलांना दरमहा आर्थिक सहाय्य दिले जात आहे. या योजनेमुळे महिलांना आर्थिक व सामाजिक बळकटी मिळत असून, हा सन्मान, आत्मनिर्भरतेचा आणि भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आदर्श ठरला आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसनिमित्त त्यांनाही शुभेच्छा दिल्या.

विधानसभा अध्यक्ष ?ड. राहुल नार्वेकर म्हणाले की, मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या कामाचा गौरव, त्यांच्यासोबतचे अनुभव, प्रभावशाली नेतृत्वाची ओळख या कॉफीटेबल बुकच्या माध्यमातून सामान्य जनतेला होईल. त्यांचा अनुभव, प्रवास सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम या पुस्तकाच्या माध्यमातून होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रासाठी 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार केले आहे. महाराष्ट्रासाठी स्वप्न बघितले असून ते पूर्ण करण्यासाठी आम्ही सदैव त्यांच्या सोबत तत्परतेने राहू, असे ?ड. नार्वेकर यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राच्या नवपरिवर्तनाचे 'महाराष्ट्र नायक' - जलसंपदा मंत्री गिरीश महाजन

जलसंपदा मंत्री गिरीश महाजन म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विविध क्षेत्रातील कार्य अफाट आहे. महाराष्ट्र राज्याला लाभलेली सुसंस्कृत परंपरा जोपासण्याचे कार्य श्री. फडणवीस यांनी केले आहे, त्यामुळे ते महाराष्ट्राच्या नवपरिवर्तनाचे 'महाराष्ट्र नायक' आहेत. त्यांच्या कार्यकाळातील महत्वाच्या निर्णयांचा, त्यांच्यातील विविध पैलूंचा, तसेच त्यांच्या कार्यकर्तृत्वाविषयी पुस्तकरूपाने ठेवा असावा या संकल्पनेतून हे कॉफीटेबल बुक साकारले. श्री. फडणवीस यांनी सलग पाच वर्षे महाराष्ट्र राज्याची धुरा यशस्वीपणे सांभाळली आणि राज्याला सर्वच क्षेत्रात शिखरावर पोहोचवले. महाराष्ट्र राज्याचे विकासचक्र अविरतपणे सुरू आहे. सर्वांत तरुण महापौर ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री अशी देदीप्यमान कारकीर्द असणारे देवेंद्रजी हे कुशल संघटक, अभ्यासू प्रशासक, धुरंदर राजकारणी, कायदेतज्ज्ञ, स्पष्टवक्ते, लढवय्ये आहेत. मार्गदर्शक आणि आदर्श नेता म्हणून देवेंद्रजी यांचा प्रवास एक सहकारी म्हणून अनेक वर्षांपासून जवळून पाहता आला, असेही श्री. महाजन यांनी सांगितले.

या कॉफीटेबल बुकमध्ये अनेक मान्यवरांच्या लक्षवेधी मुलाखती असून त्यात केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, अभिनेते आमिर खान, अमृता फडणवीस, श्रीपाद अपराजित, मृणालिनी नानिवडेकर, यांच्यासह अन्य मान्यवरांचा समावेश आहे.

या कॉफीटेबल बुकमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या संकल्पनेतून हे कॉफीटेबल बुक साकारले आहे. कॉफीटेबल बुकमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्य, त्यांची नेतृत्वशैली, विकासाचा दृष्टिकोन, प्रगत महाराष्ट्राचे व्हिजन, विकसित महाराष्ट्र २०४७, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील त्यांचे कार्य, जनमानसातील उजळ प्रतिमा, विविध क्षेत्रातील अतुलनीय योगदान, महत्त्वाकांक्षी योजनांचा रिपोर्ताज, देश पातळीवरील विविध जबाबदाऱ्या आणि मिळालेले यश, भविष्यातील मोठ्या संधींसाठी असलेले गुणविशेष आणि क्षमता, कौटुंबिक भूमिकेतील समर्पण, छंद या बाबींचा समावेश आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १५० दिवसांच्या कृती कार्यक्रमाचा मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडून आढावा



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या १५० दिवसाच्या कृती कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत असलेली विविध कामे, उपक्रमांचा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज आढावा घेतला.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, सचिव संजय दशपुते यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले, राज्यातील विकासकामांचा वेग वाढविण्यासाठी १५० दिवसांच्या कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचा असून या कार्यक्रमात सार्वजनिक बांधकाम विभागाने विहित कालमर्यादेत काम करून विकास कामाबरोबरच प्रशासकीय कामातही विभागाचे वेगळेपण सिद्ध करावे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १५० दिवसाच्या कार्यक्रमाचा सविस्तर आढावा घेऊन मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले, विभागाचे संकेतस्थळ अद्ययावत करून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक कामे विहित कालावधीत पूर्ण करावीत. यामध्ये सेवा प्रवेश नियम, आकृतीबंध, अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती, सेवाज्येष्ठता आणि पदोन्नतीची प्रक्रिया यावर वेगाने काम करावे.

'विकसित महाराष्ट्र २०४७' मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवून काम करणे गरजेचे आहे. यासाठी व्हिजन डॉक्युमेंटचा मसुदा मुदतीत पूर्ण करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मंत्रालय परिसरात बांधण्यात येणाऱ्या नवीन इमारत बांधकाम प्रकल्पांचा आढावा एका बैठकीत घेतला. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, सचिव संजय दशपुते आणि विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्रालय नवीन इमारतीचे बांधकाम कालमर्यादेत करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी संबंधितांना यावेळी दिल्या.

खेळाडूंना अधिक सुविधा देण्यासाठी निधी व्यवस्थापनात संगणकीय तंत्रज्ञानाचा वापर - क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्यातील खेळाडूंना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा विभागाच्या निधीचे पारदर्शक आणि सुसूत्र व्यवस्थापन करण्यासाठी संगणकीय तंत्रज्ञान आधारित प्रणालीचा अवलंब करण्याचे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

क्रीडा विभागातील विविध योजनांसाठीचे अनुदान व निधीचा प्रभावी वापर आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी खासगी बँकांच्या मदतीने डिजिटल प्रणाली लागू करण्यासंदर्भात मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपसचिव सुनील पांढरे, उपसंचालक आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. भरणे म्हणाले की, राज्यातील जास्तीत जास्त खेळाडूंपर्यंत क्रीडा सुविधा पोहोचाव्यात यासाठी निधीचे पारदर्शक आणि नियमबद्ध व्यवस्थापन आवश्यक आहे. यासाठी खासगी बँकांच्या समन्वयाने नियम व कार्यपद्धतीचे पालन करीत योग्य कार्यवाही करण्यात येईल. तसेच क्रीडा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना विमा आणि सुरक्षाविषयक इतर लाभ मिळावेत यासाठी देखील या प्रणालीद्वारे उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमाच्या कामांना गती देण्याचे निर्देश : अल्पसंख्याक विकास मंत्री दत्तात्रय भरणे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत विविध विकास कामे करण्याकरता आवश्यक प्रस्ताव सादर करणे, अल्पसंख्याक बहुल ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रातील वस्तीमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता वितरित केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे तसेच शासनाच्या विविध योजनाची अंमलबजावणी प्रभावीरित्या करण्याबाबत जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी यांना अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांनी निर्देश दिले.

या कार्यक्रमाअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सचिव रूचेश जयवंशी, सहसचिव किरण वाघोल, अवर सचिव मिलिंद शेणॉय तसेच राज्यातील सर्व जिल्हा नियोजन अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. भरणे म्हणाले की, प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांमध्ये पायाभूत सुविधा उभारणे, मागास भागांचा विकास आणि सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी कामे सुरू आहेत. विभागाकडून मिळणारा निधी योग्य पद्धतीने वापरणे आवश्यक आहे. निधी उपयोगिता प्रमाणपत्र सादर झाल्यास पुढील निधी उपलब्ध करून विकासकामांना गती देता येईल.

वक्फ मंडळाच्या मालमत्तेवरील अतिक्रमणाबाबत अहवाल सादर करा - अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई : परभणीसह राज्यातील वक्फ मंडळाच्या मालमत्तेवर अतिक्रमण व बेकायदेशीर व्यवहार होत असल्याच्या तक्रारींची चौकशी करून तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहेत.

मंत्रालयात आयोजित बैठकीत आशुरखाना नाले हैदर (परभणी), हजरत मोहम्मद हनीफ मस्तान रहेमान सैलानी (वाशिम), पीर साहेब सय्यद रहिमुद्दीन दर्गाह ट्रस्ट (उरण) आणि ईदगाह व्यवस्थापन कमेटी (लातूर) या वक्फ संस्थांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यावेळी सचिव रूचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी जुनेद सिंह, अवर सचिव मिलिंद शेनॉय, तहसिलदार संदीप राजपुरे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

अल्पसंख्याक विकास मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, वक्फ मंडळाच्या जागांवर अतिक्रमण आढळल्यास प्रत्यक्ष पाहणी करून त्यावर योग्य ती कारवाई करावी. जागेवरील दुकाने अथवा मालमत्तांचे संपुष्टात आलेले भाडेकरार नव्याने करण्यात यावेत. संबंधित महानगरपालिका किंवा नगरपालिका यांना याबाबत सूचना द्याव्यात. तसेच वक्फ संस्थांमधील गैरव्यवहारांबाबत तक्रारींची चौकशी करून अहवाल पुढील दहा दिवसांत सादर करण्याचेही आदेश श्री. भरणे यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले श्री संत शिरोमणी नामदेव महाराज पायरीचे दर्शन

वृत्तसंस्था ■ पंढरपूर



पंढरपूर : श्री संत नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संत नामदेव पायरीचे दर्शन घेतले. श्री संत नामदेव महाराजांच्या पायरीचे विधिवत पूजन करून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. तसेच श्री संत चोखामेळा समाधीचे व श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शनही मुख्यमंत्र्यांनी घेतले.

यावेळी मुख्यमंत्री यांचा मंदिर समितीच्यावतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, सर्वश्री आमदार समाधान आवताडे, अभिजीत पाटील, गोपीचंद पडळकर, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मंदिर समितीचे सदस्य, आचार्य तुषार भोसले, संत नामदेव महाराज यांचे वंशज, श्री संत नामदेव क्षत्रिय एकसंघाचे अध्यक्ष महेश ढवळे तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्याअंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करून माहिती घेतली. संतांचे जीवन प्रेरणादायी असून त्यांच्या जीवनकार्यातून आपल्याला विचारच नाही तर जीवनाचा मार्गही गवसतो. संत नामदेवांनी भागवत धर्माला वैश्विक धर्म केले आणि वारकरी विचाराला देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवले. वारकरी संप्रदायात त्यांचे कार्य महान आहे. अशा संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचले पाहिजे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

विठ्ठल मंदिरात व्हीआर दर्शन सुविधेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व व्हर्च्युअल वर्ल्ड यांच्या संयुक्त विद्यमाने व्ही आर दर्शन सुविधा विठ्ठलाची महापूजा आणि विविध रूपे सर्वसामान्य भाविकांना पाहता यावीत यासाठी विठ्ठल मंदिरात व्हीआर दर्शन सुविधेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. गॉगलद्वारे देवाची विविध रूपे आता देशभरातील भाविकांना पाहायला मिळणार आहे. यापूर्वी उज्जैन आणि काशी विश्वेश्वर या देशातल्या दोन ठिकाणी अशा पद्धतीची सुविधा उपलब्ध आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे भक्तनिवास व शहरातील इतर ठिकाणी भाविकांना देवाच्या पूजा व्हीआर गॉगलद्वारे पाहता येणार आहे. अल्प शुल्क असलेल्या या सुविधेमुळे भाविकांना थेट देवाच्या गाभाऱ्यात उभे राहून समक्ष पाहिल्याचा आभास निर्माण होणार आहे. वर्षभरात विठुरायाच्या केवळ मोजक्याच महापूजा होतात, तुलनेत अनेक भाविकांना या महापूजेस उपस्थित राहण्याची इच्छा असल्याने या गॉगलच्या माध्यमातून या महापूजेचा आनंद भाविकांना घेता येणार आहे.

राज्यात 'विद्यार्थी सहाय्यता केंद्र' स्थापन करणार - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेत सुलभता व पारदर्शकता मिळावी, तसेच आवश्यक मार्गदर्शन मिळावे यासाठी 'विद्यार्थी सहाय्यता केंद्रे' स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, तसेच तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर हे मान्यवर उपस्थित होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, राज्यातील विद्यार्थ्यांना तांत्रिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत सहकार्य करण्यासाठी संगणक सुविधांसह सुसज्ज अशी 'विद्यार्थी सहाय्यता केंद्रे' स्थापन करण्यात येत आहेत. ही केंद्रे विद्यार्थ्यांना अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची तपासणी, समुपदेशन आणि मार्गदर्शन याबाबत मदत करतील.

प्रत्येक जिल्ह्यातील दोन नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये ही 'विद्यार्थी सहाय्यता केंद्रे' कार्यान्वित केली जाणार आहेत. प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, ऑनलाईन अर्ज भरताना तांत्रिक सहाय्यता देणे, तसेच विविध शंका निरसन करणे ही केंद्रांची प्रमुख भूमिका असेल.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरू होणाऱ्या विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत या केंद्रांची मदत होईल, असेही श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

संपादकीय...

गाळ वर येतो तेव्हा...

राजकारणाचे 'आवाराकरण'(लुंपेनायझेशन)हे जसे शिवसेनेच्या नावे नोंदले जाईल तसे सत्ताकारणासाठी कोणाही गण्यागणप्यास दत्तक घेऊन हिंदुत्वाच्या भगव्या मखरात बसवण्याचे कृष्णकृत्य भाजपच्या नावे मांडले जाईल.सत्तेसाठी कोणास आणि किती जवळ करावे याचा किमान विवेक या महाराष्ट्रात अलीकडेपर्यंत होता, यावरही विश्वास बसणार नाही असे आताचे राजकारण! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले ते शंभर टक्के सत्य. विधिमंडळाच्या सदस्यांचे परिसरात मारामारी करणारे कार्यकर्ते, विधिमंडळातील कामकाजात वाढलेला अर्वाच्यपणा, संसदीय प्रणालीचे अधिवेशनाच्या काळात दररोज निघणारे धिंडवडे यामुळे केवळ या आमदारांचीच नव्हे; तर सर्वच लोकप्रतिनिधींची बदनामी होते, असे फडणवीस यांचे म्हणणे. 'आमदार माजले आहेत असे लोकांस वाटते, अशी लोकभावना आहे' हे मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन तंतोतंत योग्य. या विधानात काही बदल करावयाचा असेल तर तो केवळ त्याच्या भावार्थाबाबत असेल. म्हणजे 'लोकभावना आहे' या ऐवजी तशी लोकांची खात्री आहे असे म्हणणे जास्त समयोचित ठरेल. सर्वसामान्य करदात्यांच्या उत्पन्नाची वर्षानुवर्षे बेरीजही होऊ शकत नसताना या मंडळींच्या सांपत्तिक स्थितीचा सतत होणारा गुणाकार, त्यांचे कमालीचे बेमुवर्तखोर वर्तन, किमान सभ्यता-निदर्शक भाषेचा अभाव अशा अनेक कारणांमुळे हे लोकप्रतिनिधी आणि जनता यांच्यातील अंतर गेल्या काही वर्षांत प्रचंड प्रमाणात वाढू लागले आहे. झुंडगिरीसाठी आवश्यक असे या राजकारण्यांचे काही मोजके कार्यकर्ते, लाभार्थी आदी वगळल्यास सर्वसामान्यांस हे लोकप्रतिनिधी अजिबात 'आपले' वाटत नाहीत. इतकेच नव्हे; तर आपला आणि या मंडळींचा संबंध काय असाच प्रश्न हे नेते म्हणवून घेणाऱ्यांबाबत आज बहुतांश नागरिकांस पडलेला असतो. हे वास्तव. ते पाहिल्यास विधानसभेच्या प्रांगणात, आमदारांसाठीच्या भोजनकक्षात अलीकडे जे काही झाले त्यात आश्चर्य वाटावे असे काय, हा प्रश्न. उत्तम सोडा; पण बरा युक्तिवाद, अभ्यासपूर्ण नव्हे; पण किमान साक्षर वाटावेत अशी मांडणी, वाक्चातुर्य राहू द्या पण किमान वक्तृत्व म्हणावे असे बोलणे इतक्या किमान गुणांनी युक्त लोकप्रतिनिधी किती या प्रश्नाचे उत्तर देण्यास एका हाताची बोटे पुरून उरतील, अशी परिस्थिती. ती लक्षात घेतल्यास फडणवीस म्हणाले ते पटते. तथापि त्यानंतर प्रश्न निर्माण होतो : हे असे का आणि कधीपासून झाले? वाह्यातपणा, आचरटपणा करणारे, सभ्यासभ्यतेच्या सीमारेषेवर असणारे लोकप्रतिनिधी आपल्याकडे कधीच नव्हते असे नाही. याच विधिमंडळात पेपरवेट फेकून मारणारे लोकप्रतिनिधीही महाराष्ट्राने पाहिले आहेत. पण फरक असा की त्यांची ही कृती काही एका मागणीच्या पाठपुराव्यासाठी होती. ती पाठपुराव्याची तऱ्हा संपूर्ण गैर होती हे खरेच. तरीही अशा लोकप्रतिनिधींचे वर्तन कधीही एखाद्या टोळीप्रमुखासारखे नव्हते. तथापि अलीकडच्या काळात एकमेकांस तोडीस तोड असा राणा दाम्पत्यजोडा, गोपीचंद पडळकर, संजय गायकवाड, काहीही बरळू शकतात असे संजय शिरसाट, कमालीचे निंदनीय कृत्य ज्यांच्या नावे आहे ते संजय राठोड, संतोष बांगर, एका दिवसात मद्या-संबंधित परवाने मिळवू शकतात ते संदिपान भुमरे, अजून विधानसभेत पदार्पण न झालेले पण ज्यांचे पाय पाळण्यातच दिसू लागले आणि जे या पंगतीत बसू शकतील असे मोहित कुंभोज, करून करून भागले आणि राजकारणात अशा 'आवारा' मंडळींना (कुंपेन) घाऊक स्थान देण्याचे पाप शिवसेनेस आपल्या कपाळावरून पुसता येणारे नाही, हे सत्य. राजकारणात टगे म्हणावेत असे एकगठ्ठा प्रवेश करते झाले ते शिवसेनेमुळेच. भर विधानसभेत 'हऱ्या-नाऱ्या गँग'चा उल्लेख कोणास उद्देशून कोणी केला; ही बाब आता नव्याने उगाळण्याचे कारण नाही. पण या सगळ्याचे मूळ शिवसेना; हे अमान्य न करता येणारे सत्य. तथापि शिवसेना संस्थापक बाळासाहेब ठाकरे हयात होते तोपर्यंत प्राधान्याने आणि नंतर उद्धव ठाकरे यांच्या काळात काही प्रमाणात या सर्वांवर पक्ष नेतृत्वाचा वचक असे. तो कमी वा नाहीसा झाला आणि हे सर्व मुख्य प्रवाहात आले.अलीकडच्या काळातील सत्ताकारण हे आणि हेच यामागील एकमेव कारण. वरील नावांवर नजर टाकल्यास आढळणारी दुसरी बाब म्हणजे आद्या काँग्रेसी, मूळचे भाजपीय आणि डावे हे या वावदुकी राजकारणात तुलनेने कमी आढळतात. कोणास आवडो वा न आवडो; एक बाब सत्य. ती म्हणजे या पक्षीयांच्या राजकारणास काही एक वैचारिक अधिष्ठान होते आणि ही मंडळी होती तोपर्यंत राजकारणात टग्यावर्गास शिरकाव नव्हता. सत्तासुखात मग्न काँग्रेसींनी त्यांच्या 'सेवा दला'ची उपेक्षा केली. काँग्रेसचा ऱ्हास सुरू झाला. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या भाजपच्या विचारपीठाने मात्र पक्षावरील आपली पकड सैल होऊ दिली नाही. काँग्रेसने केलेली चूक भाजपने टाळली. परिणामी तो पक्ष विस्तारत राहिला. तथापि या विस्ताराच्या वाटेवर २०१४ नंतर भाजप हा पूर्णपणे सत्तावादी होत गेला आणि सत्ता मिळत असेल तर कोणाही सोम्या-गोम्यास जवळ करण्यास त्याने सुरुवात केली. वाल्याचा वाल्मीकी होऊ शकतो, हे खरे असले तरी तो एखादा. हे घाऊक प्रमाणात होत नाही. भाजपस याचा विसर पडला आणि पुढे तो पक्ष गावोगावच्या राजकीय उकिरड्यांवरून मिळेल त्या गणंगास जवळ करू लागला. राजकारणाचे 'आवाराकरण' (कुंपेनायझेशन) हे जसे शिवसेनेच्या नावे नोंदले जाईल तसे सत्ताकारणासाठी कोणाही गण्यागणप्यास दत्तक घेऊन हिंदुत्वाच्या भगव्या मखरात बसवण्याचे कृष्णकृत्य भाजपच्या नावे मांडले जाईल. राजकारण हे अंतिमतः सत्तेसाठी असते हे कोणीही अमान्य करणार नाही. पण म्हणून ते फक्त आणि फक्त सत्तेसाठीच असते ही बाब मान्य होणे अशक्य. त्या सत्तेसाठी कोणास जवळ आणि किती जवळ करावे याचा काही किमान विवेक या महाराष्ट्रात अलीकडेपर्यंत होता. परंतु तसा तो होता यावर विश्वास बसणार नाही असे आताचे
राजकारण.येनकेनप्रकारेण
येनकेन कारणांसाठी मूठभर जरी लोक एखाद्या मागे आहेत असे दिसल्यास अशी प्रत्येक व्यक्ती आपल्या पक्षात असायलाच हवी हा भाजपचा अट्टहास सध्याच्या या राजकीय हासाच्या मुळाशी आहे. गावोगावच्या राजकीय भटक्या-विमुक्तांस आपल्या पक्षात सामावून घेण्याची भाजपची जी मोहीम सुरू आहे तिचा समाचार 'लोकसत्ता'ने वेळोवेळी घेतला.गावाने ओवाळून टाकलेल्यांस पुण्यप्रद कुंभमेळ्याच्या आधी स्वपक्षात घेण्याच्या भाजपच्या कृतीवर 'अखंड भारत हेच उत्तर'(१९ जून) आणि आमदार भोजनगृहातील मारहाणीवर 'र... र... रसातळाचा' (१२ जुलै) या दोन संपादकीयांतून 'लोकसत्ता'ने त्यावर भाष्य केले. गेल्या आठवड्यात जे काही झाले ते या राजकारणाचीच परिणती. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केलेला संताप योग्यच. पण जोपर्यंत 'हे' राजकारण बदलले जात नाही तोपर्यंत त्याच्या फलनिष्पत्तीत बदल होणार नाही. राजकारणात या मंडळींचे महत्त्व कमी; पण उपयुक्तता अधिक असते. तथापि या प्राथमिक पातळीवरील उपयुक्ततेलाच महत्त्व किती द्यायचे याचा विचार सर्वच राजकीय पक्षांस करावा लागेल. त्यातही सत्ताधारी पक्षास अधिक. मुंगळे हे नेहमी गुळालाच लागतात. त्यामुळे हा गूळ ज्यांच्याकडे त्यांच्यावरील जबाबदारी अधिक. धरणाच्या स्थैर्यासाठी गाळ हवाच. पण तो पृष्ठभागी येऊन चालत नाही. देशाच्या आणि विशेषतः राज्याच्या राजकारणात तो मोठ्या प्रमाणावर वर आणला जात आहे. काळजी घ्यायला हवी.

स्वतःची काळजी दिन: इतिहास व महत्त्व!

(२४ जुलैः वर्ल्ड सेल्फ केअर डे- जागतिक स्वतःची काळजी दिन.)



निरोगी जीवनशैलीसाठी- फॉर अ हेल्दी लाइफस्टाईल- स्वतःची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. आजकाल व्यस्त जीवनात आपण स्वतःची काळजी घेण्यास दुर्लक्ष करतो. आपण प्रत्येक काम खूप मेहनत आणि वेळ देऊन करतो. पण, जेव्हा स्वतःची काळजी घ्यावी लागते तेव्हा आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. यामुळे नंतर अनेक समस्या निर्माण होतात. स्वतःवर प्रेम करा. काळजी घ्या, वेळ काढा आपल्यासाठीच सेल्फ केअर डे का साजरा केला जातो, त्याचा इतिहास आणि महत्त्व काय, जाणून घेऊ याजी... सदर श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा मार्गदर्शक लेख प्रस्तुत... संपादक.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

दुर्लक्षामुळे केवळ शारीरिकच नाही तर मानसिक समस्या- मेंटल प्राब्लेम्सनाही सामोरे जावे लागते. त्याचाही वाईट परिणाम आपल्या नात्यावर होतो. अशा स्थितीत स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे. बदलत्या जीवनशैलीत तर, स्वतःची काळजी घेणे खूप गरजेचे आहे. हे आपल्याला निरोगी आणि आनंदी ठेवते. यासाठी दरवर्षी २४ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय सेल्फ केअर डे साजरा केला जातो. जाणून घेउया, या दिवसाचा उत्सव कधीपासून सुरू झाला आणि या दिवसाचे महत्त्व काय आहे. आज रोजी आंतरराष्ट्रीय सेल्फ केअर डे साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्याचा उद्देश स्वतःची काळजी घेणे हा आहे. चांगल्या जीवनशैलीसाठी स्वतःची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. आपल्याला शारीरिक, मानसिक आणि भावनिकदृष्ट्या स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे. या कारणास्तव, आंतरराष्ट्रीय सेल्फ केअर फाऊंडेशनने सण २०१४मध्ये हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. ही यूके स्थित एक धर्मादाय संस्था आहे. या फाउंडेशनचा असा विश्वास आहे की, जेव्हा प्रत्येक व्यक्ती प्रथम स्वतःची काळजी घेते तेव्हा निरोगी समाजाची सुरुवात होते. कोविड-१९ महामारीच्या काळात विषाणूपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी, आपल्याला स्वतःची खूप काळजी घ्यावी लागली, यापुढे देखील अशीच काळजी घेणे काळाची गरज आहे.

रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी सकस आहार घ्यावा, व्यायाम करावा आणि स्वतःला निरोगी ठेवावे. त्यामुळे आपला अनेक आजारांपासून बचाव होईल. सोरायसिस आणि मानसिक आरोग?य तज्ञांचा प्रभावी व?यवस?थापना संदर्भात अत्यंत महत्वाचा सल?ला आहे. माता, भगिणींनोष्ठ चांगला आहार घ्या आणि अधिक काळ जगा! समृद्ध आहारानं वाढतं स्त्रीयांचं आयुर्मान; संशोधनातली माहिती. मलेरिया झाल्यास पपई खावी; गंभीर आजारासाठी फळे आहेत फायदेशीर! नकारात्मकतेपासून दूर राहावे, निसर्गाच्या जवळ जावे, त्वचेची काळजी घ्यावी, योगासने करावीत, व्यायाम करावे, निरोगी रहावे, चांगली आणि गाढ झोप घ्यावी, जीवनाचा आनंद घ्यावा, आरोग्य तपासणी करावी, पुस्तके वाचावी आणि थोडा वेळ एकांतात घालवावा.

हा दिवस स्वतःवर प्रेम आणि आपल्या शरीराची आणि काळजीच्यापर्यायासाठी योग्य आहे. मागील वर्षाची थीम होती- 'लवचिकता, अनुकूलता आणि प्रतिकूलतेने भरभराट' लोकांमध्ये लवचिकता निर्माण करण्यासाठी तीव्र निषेध, जे व्यक्तींना त्यांचे व्यवस्थापन करण्यास, नकारात्मक भावना, शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्यासाठी मदत करू शकते. प्रत्येक दिवशी स्वतःची काळजी घेणे निवडले तरी, काही स्वयं-कळजीच्या गोष्टी आपण सुरू करू शकतो. या वर्षापासून केअर डे कसे हे स्पष्ट कराल. येथे हे एक साधे मार्गदर्शन आहे. वेलनेस आणि सौंदर्य जे विकते त्या विरुद्ध, स्वतःची काळजी विस्तृत किंवा फॅन्सी आवश्यक नाही. स्वतःसाठी वेळ शोधावा. हे आपल्या बोलण्यावरून स्वतःसाठी वेळ काढण्याइतके असू शकते. दिवसातून फक्त एक तास का असेना, आमच्या कॅलेंडरमध्ये आम्हाला आनंद देण्यासाठी काही वेळ शेड्यूल करुया. याचा अर्थ असा असू शकतो की आमची वेब सिरीज पाहणे, एखादे पुस्तक वाचणे, हे न करण्यासाठी लांब चालणे. आपण पौष्टिक आहार घ्यावा. जाणकारांनी म्हटल्याप्रमाणे, स्वतःची काळजीही फक्त बबल बाथ आणि फेस मास्कच्या पलिकडे आहे. निरोगीपणाच्या इतकेच आणि प्रभावी हे स्वतःच्या काळजीच्या पैलूंपैकी एक आहे. अधिकतर पालेभाज्या, ताजी फळे आणि संपूर्ण धान्य आम्हाला समतोल आहाराने उर्जा निश्चितच मिळेल, पण आमचे आरोग्यही संपूर्ण असेल. त्याचप्रमाणे आपण आनंद घ्यावा. अन्नापासून वंचित राहणे विसरावे- जसे की आमचा आवडता पदार्थ झाला नाही म्हणून आनंद नसतो. तथापि, अतिरेक करू नका आणि संयमाचा सरावही करू नका. रोज व्यायाम करावा. नियमित व्यायाम तंदुरुस्तीची गती वाढवतो आणि तगण्याची क्षमता निर्माण करण्यात मदत होते, ते डोपामाइन आणि ऑक्सिटोसिन, कारण ल-गुड आरोग्याची मानसिकता कमी करते आणि मानसिक संतुलन बिघडते. सुधारणे देखील मदत करते. आमच्या कुटुंबाशी आणि मित्रांबद्दल संपर्कात राहण्याचा हा एक चांगला मार्ग आहे, विशेषतः जर आपण समूह सहभाग घ्यावा. आपण लक्षात ठेवा- व्यायामासाठी परिपूर्ण फिटनेस दिवस किंवा जिममध्ये जाण्याची आवश्यकता नाही. याचा अर्थ तुमची फक्त दिवसेंदिवस पायरी मोजणे किंवा योगा, पोहणे किंवा नृत्य या व्यायामासाठी शारीरिक व्यायाम गरजेचा ठरतो.

आपल्या सहाय्याने माहिती पुरेशी पाहणे हे चांगले आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आहे, आपण रात्री ७-८ तास झोपेचे लक्ष्य ठेवले पाहिजे. पूर्णपणे स्वच्छतेचा सराव करून कुटुंबियांना सहभागी करून घेणे, आजारी स्वभावींचा स्वभाव सुधारते. साधा ताप, खोकला, खिळा टोचणे, चट्टा, फोड येणे, याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. पुढे जाऊन मलेरिया, दमा, धनुर्वात, भयंकर त्वचारोग अशा विकारांच्या समस्या उद्भवू शकतात.

बौद्ध धर्मग्रंथ माइंडफुलनेस स्पष्ट करतात. तिची व्याख्या त्याच्या उद्देशाशी संरेखित करते. आम्हाला अधिक स्पष्टपणे पाहण्यासाठी मदत करण्यासाठी, जीवन आपल्यावर काय फेकते त्याला अधिक प्रभावीपणे प्रतिसाद आणि शेवटी अधिक शहाणपणाने निवड करा. हे फोक आणि एकाग्रता सुधारण्यासाठी, व्यवस्थापित करण्यात सकारात्मक आणि भावना वाढवण्यास मदत करते. तुम्ही श्वासोच्छवासाचे व्यायाम, ध्यान, योग किंवा सकारात्मक साधनांच्या मदतीने अंतर्मनाशी संपर्क साधून अंतरिक शक्तीचा उपयोग करू शकता.

!! आंतरराष्ट्रीय स्वतःची काळजी दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

कृतघ्न...

पावसाळा देईकळा
लपंडाव वीज करी
शिव्या वीज मंडळा
भडीमार फोन वरी

वीज बील थकलेले
ना काही जिम्मेदारी
सेवा मात्र तत्परतेने
घर पोच हवी दारी

कामामधे व्यग्र असे
वायरमन कर्मचारी
भिजला का बोल रे
कोण तया विचारी

चढताना पोल वरी
उदार ते जीवा वरी
सगळे समान त्याले
प्रेम करी गावा वरी

प्रकाशा न्हाहे सारी
त्यांचीचं कामगिरी
धन्यवाद शब्द सांग
कधीआलेओठावरी

काम त्यांचे ते करी
बोल लावी परोपरी
कृतघ्नता ठासलेली
नाही होत उपकारी

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

मांसाहार...

का योग्य
मांसाहार
अनेक दिले दाखले
आम्ही कसे बरोबर
आराखडे ते आखले

कैक प्राणीपक्षीमासे
मिटक्यामार चाखले
तब्येतीचे कारण देत
व्यंजन मस्त चोखले

सकलजीवांची हत्या
रक्ताने तोंड माखले
शाकाहार करणा-या
नेहमीचं गौण रेखले

जीवोजीवस्य जीवन
ब्रीद वाक्य बा रेखले
भले किती तरी जीव
जीवा आपले मुकले

झाडपाला उगा खाई
शाकाहारी ते चुकले
जात धर्म पंथ पक्ष रे
भेदा भेद मागे टाकले

आम्ही आता ग्लोबल
हात आभाळां टेकले
अभक्ष्य प्रकार नुरला
काहीही जाते विकले

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

राज्य कामगार विमा योजनेचा लाभ तळागाळातील गरजू कामगारांपर्यंत पोहोचवावा : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : राज्य कामगार विमा योजना ही केंद्र सरकार व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने राबविली जात असून या योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या विविध सुविधा उत्तम प्रकारच्या असून यांचा लाभ तळागाळातील गरजू कामगारांपर्यंत पोहोचवावा, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित राज्य कामगार विमा महामंडळाच्या कामकाजाबाबतच्या आढावा बैठकीत श्री. आबिटकर बोलत होते. यावेळी राज्य कामगार विमा सोसायटीचे आयुक्त रमेश चव्हाण, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, राज्य कामगार विमा महामंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी सुकांतचंद्र दास, कामगार विमा सोसायटीचे वैद्यकीय प्रशासन अधिकारी डॉ. बाळकृष्ण रंगदळ, बिबवेवाडी येथील विमा महामंडळाच्या रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकक्षक डॉ. अभिमन्यू पांडा आदी मान्यवर उपस्थित होते.

आरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले, या योजनेत कामगारांची नोदणी वाढविण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, तळेगाव, रांजणगाव, चाकण, इ. कामगार असोसिएशनचे सहकार्य घ्यावे. एमआयडीसी मधील विविध कंपन्या तसेच इतर आस्थापनांनी कामगारांच्या विमा नोंदणीसाठी शिबीराचे आयोजन करावे व यामाध्यमातून जास्तीत जास्त कामगारांना या योजनेत सहभागी करुन घ्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

राज्य कामगार विमा विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उद्दीष्ट निश्चित करुन जास्तीत जास्त कामगारांपर्यंत या योजनेचा प्रचार प्रसार करुन पुणे जिल्ह्यातील २१ कामगार सेवा दवाखान्यात नोंदणी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी श्री. डूडी म्हणाले, बिबवेवाडीच्या कामगार रुग्णालयाचे काम उत्तमप्रकारे सुरू असून त्याठिकाणी दुय्यम आरोग्यसेवा चांगल्याप्रकारे उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणेच पुणे जिल्हा रुग्णालयात उत्तम सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मार्गदर्शक आराखडा तयार करावा. तसेच पुणे जिल्ह्यातील कामगारांसंबंधित सर्व आस्थापनांनी समन्वय साधून विमा कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी एकत्रित प्रयत्न करुन एक महिन्यात उद्दीष्ट साध्य करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या.

राज्य कामगार विमा सोसायटीचे आयुक्त रमेश चव्हाण यांनी कामगार विमा योजनेंतर्गत येणाऱ्या विविध सुविधांची माहिती दिली व या योजनेत विमा रुग्णांच्या उपचारासाठी कोणतीही उच्चतम मर्यादा नसल्याने सर्वात चांगली योजना असल्याचे सांगून उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन आयटीआयमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणार : कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा

वृत्तसंस्था ■ सातारा

सातारा : राज्यातील उद्योगांना आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) उद्योग आधारीत पुरक असे नवनवीन कोर्सेस उपलब्ध करुन देण्यात येतील. कौशल्य विकास विभागाकडे जवळपास ६ हजार कोटींचा निधी उपलब्ध असून या मधून राज्यातील सर्व आयटीआय चे सक्षमीकरण करण्याला प्राधान्य दिले जाईल, असे प्रतिपादन कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविण्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.



सातारा एमआयडीसी येथील मास भवन मध्ये उद्योजकांशी संवाद साधण्यासाठी, त्यांच्या गरजा जाणून घेण्यासाठी, इंडस्ट्रियल मिट चे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार मनोज घोरपडे, श्रीमती प्रिया महेश शिंदे, उद्योग विभागाचे सहसंचालक चंद्रकांत ढेकणे, मासचे अध्यक्ष संजोग मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, उद्योगजगात आणि शासन यांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. उद्योगजग आनंदी असेल तर विकासाला हातभार लागतो. महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती चंगली आहे. अनेक उद्योग महाराष्ट्रात येण्यासाठी उत्सुक आहेत. उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ विकसित करण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत. तरुण पिढीला नवनवीन कौशल्य वृध्दी झाल्यास त्यांच्याही हाताला काम मिळेल या कौशल्य विकासासाठीच आयटीआय मध्ये नवनवीन कोर्सेस सुरु केले जात आहेत. पार्ट टाईम प्रशिक्षण कोर्सेसही लक्षात घेवून सुरु करता येतील. मासमध्येही सातारा येथील उद्योगांना पूरक ठरेल असे स्किल सेंटर उभे करावे. त्याला ३० दिवसात आवश्यक त्या सर्व परवाणग्या व निधी उपलब्ध करुन देता येतील.

या इंडस्ट्रियल मिटमध्ये मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी उद्योजकांशी मोकळेपणाने संवाद साधून कुशल मनुष्यबळ विषयक त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यावर सकारात्मक पावले टाकण्यात येतील, असे आश्वस्त केले.

यावेळी आमदार मनोज घोरपडे म्हणाले, सातारा जिल्ह्यातील रस्ते, वीज, पाणी जमिन यासर्वच बाबतीत संपन्न आहे. पुढील काळात या ठिकाणी मोठ्या प्रमाणात नवनवीन उद्योग यावेत, यासाठी सर्वातोपरी प्रयत्न केले जातील.या याप्रसंगी सातारा जिल्ह्यातील अनेक उद्योजक आयटीआय चे प्राचार्य उपस्थित होते.

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या पुरस्कारांची घोषणा -धायगुडे, जवादे, वंसकर, मलये, जाधव, झुंजारराव पुरस्काराचे मानकरी

रांजणगाव गणपती/ प्रतिनिधी :बाळासाहेब कुंभार

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे तर्फे देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय विविध साहित्य पुरस्कारांची घोषणा बुधवारी (दि. २३) करण्यात आली. सन २०२४ वर्षातील बालसाहित्यातील नऊ विभागात पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू, कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी यांनी निवेदनाद्वारे दिली.

कादंबरीसाठी दिला जाणारा लोखंडे-जोशी पुरस्कार कल्पना मलये कणकवली यांच्या 'सई' या पुस्तकाला जाहीर झाला आहे. वा. गो. आपटे पुरस्कार रवींद्र जवादे, मूर्तिजापूर यांच्या 'चिंटू अस्वल आणि त्याचे घर' या कथासंग्रहाला, ग. ह. पाटील पुरस्कार रमेश वंसकर, गोवा यांच्या 'वाऱ्या वाऱ्या आंबे पाड' या कवितासंग्रहाला, दयार्णव कोपर्डेकर पुरस्कार प्रमोद धायगुडे, वाघोशी, खंडाळा यांच्या 'आबली' या किशोर कथासंग्रहाला, लीलाताई भागवत पुरस्कार डॉ. विठ्ठल जाधव, बीड यांच्या 'एकविसाव्या शतकातील बालसाहित्य' या समीक्षा ग्रंथाला, प्रथम प्रकाशनासाठी कारले गुरुजी पुरस्कार राजेंद्र झुंजारराव, पुणे यांच्या 'चिमण्यांची शाळा' या पुस्तकाला, तर उत्कृष्ट सजावटीचा सर्जेराव जगताप पुरस्कार विजयकुमार चित्तरवाड, छ. संभाजीनगर यांना 'वाचू गाऊ नाचू आनंदे' पुस्तकाच्या सजावटीसाठी जाहीर झाला आहे. दिवाळी अंक - आनंद मासिक हा पुरस्कार 'छावा' दिवाळी अंकाला जाहीर झाला आहे. 'छावा'च्या संपादक डॉ. गीताली टिळक आहेत. बालसाहित्य प्रकाशनासाठी दिला जाणारा बा. रा. मोडक पुरस्कार नंदिनी प्रकाशन, पुणे यांना जाहीर झाला आहे.

बालसाहित्य पुरस्कारासाठी संस्थेकडे १०० पेक्षा अधिक पुस्तके प्राप्त झाली होती. पुस्तकाचे परीक्षण प्रा. सचिन पालवे, रवीकांत आदरकर, सचिन बेंडभर व शिवाजी चाळक यांनी केले. संस्थेतर्फे २ ऑगस्ट रोजी पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा सकाळी १०:३० वाजता लता मंगेशकर सभागृह, मॉर्डन महाविद्यालय, शिवाजीनगर पुणे -५येथे आयोजित करण्यात आला असून ९१व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख व संदर्भ तज्ज्ञ, ग्रंथ प्रसारक प्रसाद भडसावळे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

सन्मानपत्र, रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती माधव राजगुरू आणि अनिल कुलकर्णी यांनी दिली. या कार्यक्रमाला संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी उपस्थित असणार आहेत.

अभिनव वाचन उपक्रमातील विद्यार्थ्यांचा गौरव

संस्थेतर्फे ऑगस्ट २०२४ते डिसेंबर २०२४या कालावधीत राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी अभिनव वाचन उपक्रम घेण्यात आला होता. त्यात विद्यार्थ्यांनी अभ्यासेतर पुस्तके, ग्रंथांचे वाचन करून त्या त्या पुस्तकाबद्दलचे मनोगत स्वहस्ताक्षरात दर महिन्याला नियमित लिहून पाठविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार या उपक्रमात सर्वाधिक पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव केला जाणार आहे. त्यात उपरी ता. पंढरपूर विद्यार्थी - श्रावणी नागणे, राधा पवार, साक्षी वाघमारे, कीर्ती शिरगुरकर, सायली लोखंडे, छ. संभाजीनगर येथील विद्यार्थी - राहेश कुलकर्णी, श्रेया नातू, गौतमी अजगावकर, अंजली केने, निधी कांकरिया, कवडा, हिंगोली येथील विद्यार्थी - पवित्रेश?वर चक्रधारी, सृष्टी नरवडे, तेजस्विनी देवरे, अनुष्का भोपळे, वरद भुजंग, नयना गवई यांचा गौरव केला जाणार आहे.

तसेच मार्गदर्शक शिक्षक शिवाजी नागणे, सोलापूर, डॉ. विनोद सिनकर, छ. संभाजीनगर, बबन शिंदे हिंगोली, प्रा. सुहास सदावर्ते, जालना यांचा वाचनगुरू म्हणून पाहुण्यांच्या हस्ते सत्कार केला जाणार असल्याचेही संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू यांनी सांगितले.

सुश्रद्धा सोशल वेल्फेअर फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष सद्धम्मप्रिय, दानशूर सुशांत मोरे यांच्या वतीने भिख्खू संघाला जीवनावश्यक अन्नधान्य वस्तूंचा पुरवठा

बोरघर / माणगांव (विश्वास गायकवाड)

श्रद्धा शील संपन्न धम्म उपासक,अनाथपिंडक गौरव पुरस्कार सन्मानित व सम्राट अशोक गौरव पुरस्कार सन्मानित सद्धम्मप्रिय महा दानशूर व्यक्तीमत्व, यशस्वी उद्योजक सुश्रद्धा सोशल वेल्फेअर फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष सुशांत नामदेव मोरे यांच्यावतीने भिक्खू संघाला जीवनावश्यक अन्नधान्य वस्तूंचा पुरवठा (तीन महिन्यांचा किराणा सामान) दान करण्यात आला.



भगवान गौतम बुद्धांच्या करुणामय धम्माचे अनुकरण करीत, तसेच भिक्खू संघाची सेवा हीच सर्वोच्च पुण्यकर्म आहे या भावनेतून सुश्रद्धा सोशल वेल्फेअर फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष, श्रद्धा शील संपन्न उपासक, महा दानी, महा दानशूर व्यक्तीमत्व सद्धम्मप्रिय सुशांत मोरे यांनी आपल्या श्रद्धेने प्रेरित होऊन भिक्खू संघाच्या वर्षावास काळासाठी तीन महिन्यांचा किराणा सामान, तथा जीवनावश्यक अन्नधान्य वस्तूंचा पुरवठा अत्यंत निष्ठेने आणि श्रद्धापूर्वक भक्तीभावाने अर्पण केला आहे.

सद्धम्मप्रिय सुशांत नामदेव मोरे यांनी भिख्खू संघाला दिलेले हे दान ऐतिहासिक महा दानशूर व्यक्तीमत्व अनाथपिंडक यांची आठवण करून देणारे असून,धम्मकार्याच्या सेवेसाठी एक मौल्यवान योगदान आहे. त्यांच्या या कृतीतून इतर श्रद्धावान उपासक व उपासिकांना प्रेरणा मिळेल,असा विश्वास आम्ही व्यक्त करतो असे भिख्खू संघाने हे दान स्वीकारताना म्हटले आहे. भवतु सब्बमंगलं।

सुखीता होंतु भिक्खू संघ।

धम्मसेवेचे दीप असेच तेवत राहो।

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा रक्तदान शिबिरांबरोबरच अन्नदान वाटपाचेही आयोजन

ओगलेवाडी (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात विविध लोकोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस रामकृष्ण वेताळ यांच्या पुढाकाराने नागझरी, वळसे आणि उंब्रज येथील शाळांमध्ये अन्नदानाचे वितरण करण्यात आले, तर मसूर आणि उंब्रज येथे महारक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले.



या उपक्रमांत माजी जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, लोकसभा समन्वयक सुनील काटकर, जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद गायकवाड, माजी मंडळ अध्यक्ष शंकरराव शेजवळ, सरचिटणीस संतोष कणसे आणि सोशल मीडिया अध्यक्ष रवींद्र लाहोटी यांची प्रमुख उपस्थिती होती.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस कराड उत्तर मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या वतीने उत्साहात व सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. यावेळी नागझरी (ता. कोरेगाव) येथील आश्रमशाळेतील १०० विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजन, एहसास मतिमंद मुलांची शाळा वळसे (ता. कराड) व जागृती माध्यमिक आश्रमशाळा उंब्रज (ता. कराड) येथील विद्यार्थ्यांसाठी अन्नदान करण्यात आले.तसेच, मसूर व उंब्रज येथील रक्तदान शिबिरांत एकूण २०० पेक्षा जास्त पिशव्या रक्त संकलित करण्यात आल्या.

या दोन्ही उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी तुकाराम नलवडे, योगीराज सरकाळे, बाजार समिती संचालक राजेंद्र चव्हाण, राज सोनवणे, दिपाली खोत, नवीन जगदाळे, जितेंद्र मोरे, बाळासाहेब पोळ, जयसिंग डांगे यांच्यासह सरचिटणीस शहाजी मोहिते, रघुनाथ शेडगे, सचिन नांगरे, भूषण शेजवळ तसेच कराड उत्तर मतदारसंघातील भाजपा पदाधिकारी व बुथ अध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

न्याय मिळाला नाही तर लाडकी बहीण योजनेचा त्याग करणार क्रशर विरोधी लॉग मार्च मधील महिलांचा निर्धार

वाई प्रतिनिधी प्रशांत थोरवे

आज लॉग मार्च च्या सातव्या दिवशी कुसगाव एकसर व्याहळी या गावातील आंदोलनामध्ये सहभागी असणाऱ्या महिलांनी सरकार विरोधी एक ऐतिहासिक निर्णय घेण्याचा निर्धार केला.

ज्या राज्य शासनाला मागच्या आठ दिवसांमध्ये आमची थोडीही दया आली नाही ज्यांना आमच्या डोळ्यातील अश्रू, आम्हाला होणारा त्रास दिसला नाही ते सरकार आम्हाला न्याय देऊन आमचा सन्मान करू शकत नाही त्यामुळे त्यांच्याकडून आम्हाला लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून मिळणारा सन्मान निधी नको असा निर्धार महिलांच्या वतीने करण्यात आला.



आज सुस रोड पासून वाकड पर्यंतचा आजच्या दिवसाचा १२ किलोमीटरचा पायी प्रवास पूर्ण करत वाई पासून ११६ अन किलोमीटर अंतर आंदोलनकर्त्यांनी पूर्ण केल. आजही वाई तालुक्यातील विविध सामाजिक राजकीय संघटनांनी लॉन्ग मार्चला आपला पाठिंबा दर्शवला.

या लॉग मार्चला पश्चिम भागासहित वाई तालुक्यातील सर्व स्तरावरून पाठिंबा मिळताना दिसत आहे. वाई तालुक्यातील घराघरात गल्लीबोळात चौका चौकात या आंदोलनाची जोरदार चर्चा सुरू आहे. आंदोलनकर्त्यांचे होणारे हाल वर्तमानपत्र व सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचत आहेत त्यामुळे सर्वच स्तरावरून मोठ्या प्रमाणात पाठिंबा या आंदोलनाला मिळत आहे.

अनेक संस्था वाई तालुक्यातील अनेक युवक वैयक्तिक स्तरावरती या आंदोलनाला सहकार्य करण्याचा प्रयत्न करत आहेत. आंदोलनकर्त्यांच्या राहण्याच्या सोयींपासून ते जेवणापर्यंत सर्व सुविधा पुरवण्याचे जोरदार नियोजन गावागावात सुरू आहेत. ज्यांना आंदोलन स्थळी येता येत आहे ते त्या ठिकाणी पोहोचत आहेत ज्यांना शक्य नाही ते वेगवेगळ्या स्वरूपाने या आंदोलनाला मदत करत आहेत.

मात्र आंदोलनकर्त्यांच्या वेगळ्याच मागणीने तालुक्यातील अनेकांच्या डोळ्यात पाणी आले. आज आम्हाला जेवण पाणी राहण्याच्या सोयीपेक्षा तुमच्या आमच्या सोबत या लॉग मार्चमध्ये येण्याने आम्हाला खऱ्या अर्थाने बळ मिळेल अशी भावनिक साद या आंदोलनकर्त्यांनी वाई तालुक्यातील नागरिकांना घातली आहे यावर येणाऱ्या काळात कशा स्वरूपाचा प्रतिसाद मिळतो हे पहावे लागेल

उरण महाविद्यालयात नवं शैक्षणिक धोरण कार्यशाळा संपन्न

दै जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे

उरण : कोंकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी समिती यांच्या अंतर्गत प्रथम वर्ष वाणिज्य, कला, वाणिज्य (अकाउंटिंग व फायनान्स) ह्या विद्यार्थ्यांकरिता तसेच पालकांकरिता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम उपस्थितांचे परिचय व स्वागत प्रा. डॉ. ए. के. गायकवाड यांनी केले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात नियमित उपस्थित रहाणे आवश्यक आहे. परंपरागत पदवी अभ्यासक्रमासोबत इतर कौशल्य विकास अभ्यासक्रम



महाविद्यालयातील शिक्षणासोबत घेतले पाहिजे. तरच आपल्या पाल्याला रोजगार मिळेल. असे मनोगत माजी प्राचार्य किशोर शामा यांनी व्यक्त केले. जगाच्या शाश्वत विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण अत्यंत महत्त्वाचे आहे असे मनोगत विविध देशांच्या उदाहरणाद्वारे प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांनी मांडले. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मधील विविध उद्दिष्टे आणि प्रामुख्याने क्रेडिट स्ट्रक्चरच्या माध्यमातून आपली पदवी, पदव्युत्तर शिक्षण कसे पूर्ण करावे याचे मार्गदर्शन नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी समितीचे प्रमुख प्रा. डॉ. पी आर कारूळकर यांनी सांगितले. नवीन शैक्षणिक धोरणामधील परीक्षेचे स्वरूप कसे आहे याबाबत मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीमुळे, वेळोवेळी महाविद्यालयाने पाठविलेले सूचनांचे पालन केल्यामुळे आपला पाल्य अधिक चांगली शैक्षणिक प्रगती करेल. असे परीक्षा विभाग प्रमुख डॉ. एम.जी.लोणे यांनी सांगितले. आजच्या बदलत्या सामाजिक घडामोडीमुळे पालक विद्यार्थी संवाद खूपच महत्त्वाचा आहे अशा प्रकारचे उद्गार महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य रमेश ठाकूर यांनी काढले. कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ.ए.आर.चव्हाण यांनी मानले.सदर कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. व्हि. एस. इंदुलकर तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालक प्रा. डॉ. ए.के. गायकवाड , प्रा.आर.टी. ठवरे, डॉ. ए आर. कांबळे , डॉ. डी .पी हिंगमिरे, अकाउंटिंग अँड फायनान्स विभाग प्रमुख आर . पी. पठाण तसेच उपस्थित इतर सर्व प्राध्यापिका व प्राध्यापक, विद्यार्थी पालक यांच्या उपस्थितीने शिक्षक पालक विद्यार्थी सभा यशस्वी झाली.

महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त अश्विनी हॉस्पिटल लोणंद येथे महा रक्तदान शिबिराचे केले आयोजन

लोणंद प्रतिनिधी ,: प्रतिनिधी पांडुरंग कुंभार

लोणंद मधील अश्विनी हॉस्पिटल येथे महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण राज्यात रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते लोणंद येथेही भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले या शिबिराचे उद्घाटन मा .समाज कल्याण सभापती आनंदराव शेळके पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी खंडाळा पूर्व मंडल अध्यक्ष देविदास चव्हाण रोटरी क्लब अध्यक्ष भरत शेठ गांधी नारायण अण्णा साळुंखे प्रदीप क्षीरसागर सुभाष शिरसागर विठोबा पाटील जिल्हा सरचिटणीस हर्षवर्धन शेळके पाटील युवा नेते राहुल गाडगे नगरसेविका दिपाली शेळके ज्योती डोनीकर मान्यवर



उपस्थित होते उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना मा .समाज कल्याण सभापती आनंदराव शेळके पाटील म्हणाले की मुख्यमंत्री देवेंद्र देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरास नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे हे रक्तदान शिबिर म्हणजे आपल्या नेत्यावर असलेले निष्ठा प्रेम विश्वास हे साक्षात उदाहरण आहे भाजपमध्ये प्रामाणिकपणे काम करणाऱ्याला नक्कीच संधी मिळते यावेळी नवनिर्वाचित मंडलाध्यक्ष देविदासजी चव्हाण यांनी खंडाळा पूर्व मंडळातील कोणत्याही नागरिकांना अडचण आल्यास यासाठी आम्ही सतत कार्यरत राहू मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही २४ तास जनतेसाठी उपलब्ध राहणार आहोत अशे आश्वासन दिले शिबिर यशस्वी करण्यासाठी अतिशय नेटके नियोजन करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम रोटरी क्लबचे अध्यक्ष भरत शेठ गांधी सचिव पवन सूर्यवंशी डॉक्टर किशोर बुटीयानी यांचे विशेष सहकार्य लाभले याशिवाय प्रकाश कराडे नारायण ठोंबरे दिलीप कराडे अनिल कुदळे आप्पासाहेब शेळके कोंडीबा उंब्रजकर नवनाथ शेळके विकास ननवरे रविकांत भोसले गणेश गुंडगे संतोष खताळ तेजस क्षीरसागर लक्ष्मण कुंडलकर गणेश इंगळे यांची ही विशेष उपस्थिती या कार्यक्रमासाठी होती या क्रमांकाचे स्वागत आनील कुदळे यांनी केले आणि आभार श्रीधर सोनवलकर यांनी मांडले या कार्यक्रमात सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून राबवण्यात आला असून खंडाळा पूर्व मंडळातील असंख्य नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला.

महाराष्ट्राचे कृषिमंत्री जंगली रमी खेळ खेळून कर्जमाफीसाठी फंड गोळा करताय काय? संतप्त सवाल प्रमोद जगदाळे

कराड/राहुल पवार

महाराष्ट्राचे कृषिमंत्री कोकाटे यांचा विधानसभेत मोबाईलवर 'जंगली रमी' खेळतानाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे, ज्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. शेतकऱ्यांशी संबंधित अनेक ज्वलंत प्रश्न प्रलंबित असताना, दररोज ७ शेतकरी या व्यवस्थेकडून न्याय मिळत नसल्याने गळ्यात फास अडकवून घेत असताना सभागृहात मंत्र्यांचे असे वर्तन पाहता, या कृषिमंत्र्यांनी यापूर्वी शेतकऱ्यांबद्दल केलेली अवमानकारक वक्तव्ये आणि आता विधानसभेतील हा व्हिडिओ, यामुळे शेतकऱ्यांच्या भावना तीव्रतेने दुखावल्या आहेत.

महाराष्ट्रातील शेतकरी सध्या अनेक संकटांनी ग्रासले आहेत - कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ, कधी बोगस बियाणे तर कधी शेतमालाला नसलेला भाव. या दुष्टचक्रात शेतकरी पिचला आहे. त्यातच, महायुतीने विधानसभा निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे खोटे आश्वासन देऊन केवळ मतांचा जोगवा मागितला, असा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटना करत आहेत. निवडणुकीनंतर या आश्वासनांची पूर्तता झाली नाही, उलट शेतकऱ्यांना अजूनही कर्जमाफीच्या प्रतीक्षेत राहावे लागत आहे. या अन्यायाविरोधात महाराष्ट्रभर विविध प्रकारची आंदोलने सुरू आहेत.



शेतकरी आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरत असताना, नुकत्याच झालेल्या अधिवेशनात शेतकऱ्यांना दिलासा देणारा कोणताही मोठा निर्णय घेण्यात आला नाही. दुधातील भेसळ, बोगस खते आणि खतांचे लिंकिंग यांसारख्या गंभीर प्रश्नांवरही अधिवेशनात कोणताही ठोस निर्णय झाला नाही. याउलट, ज्या कृषिमंत्र्यांकडून शेतकऱ्यांना मदतीची अपेक्षा आहे, तेच मंत्री सभागृहात 'जंगली रमी' खेळत असल्याचा व्हिडिओ समोर आल्याने शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग झाला आहे. 'हा कृषी मंत्री ऑनलाईन जंगली रमी खेळून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मोठा फंड जमवतोय काय?' असा संतप्त सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कराड उत्तरचे तालुकाध्यक्ष प्रमोदसिंह जगदाळे यांनी केला आहे .

अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात दोन आमदारांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधानसभेच्या लॉबीत झालेल्या हाणामारीमुळे विधिमंडळातील गांभीर्य आणि पावित्र्य धोक्यात आल्याचे दिसून आले. अशा घटना लोकप्रतिनिधींच्या जबाबदारीच्या विस्मरणाची आणि जनतेच्या प्रश्नांपेक्षा इतर गोष्टींना प्राधान्य देण्याची निदर्शक आहेत.

राजकीय कुरघोडी विरुद्ध शेतकऱ्यांचे अश्रू

एकीकडे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी कर्जमाफी, शक्तीपीठ महामार्ग, अलमट्टी धरण उंचीबाबत सातत्याने विविध आंदोलने करत आहेत. दुसरीकडे, प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांचे याच विषयावर पदयात्रा सुरू आहे. शेतकऱ्यांचे नेते रस्त्यावर उतरून शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी संघर्ष करत असताना, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यापेक्षाही आमदार, खासदार फोडणे, आणि आगामी नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच मुंबई, पुणे महानगरपालिकेत सत्ता मिळवणे अधिक महत्त्वाचे वाटत आहे, असे चित्र दिसत आहे.

लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना, विशेषतः अशा महत्त्वाच्या सभागृहात, मंत्र्यांकडून अत्यंत गांभीर्य आणि जबाबदारीची अपेक्षा असते. राज्याच्या विकासाचे आणि जनतेच्या हिताचे निर्णय घेण्याचे हे पवित्र स्थान आहे. अशा ठिकाणी मंत्र्यांनी असे असंवेदनशील वर्तन करणे, हे केवळ पदाचा गैरवापर नाही, तर लोकशाही मूल्यांची पायमल्ली आहे.

या घटनेनंतर, राज्य सरकारने यावर तातडीने कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या भावनांचा आदर करत, त्यांच्या मागण्यांवर गांभीर्याने विचार करून त्वरित निर्णय घेणे गरजेचे आहे. अन्यथा, शेतकऱ्यांचा हा संताप भविष्यात मोठ्या तीव्रतेने आंदोलनाचे रूप घेऊ शकतो.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या असंवेदनशील जुगारी कृषिमंत्र्याला ताबडतोब मंत्रीपदावरून हाकलून लावावे अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे. अशीच अपेक्षा राज्यातील प्रत्येक शेतकरी करत आहे.

हे सर्व पाहता, लोकप्रतिनिधींनी आपल्या जबाबदाऱ्या विसरून, केवळ राजकीय डावपेचांना प्राधान्य दिल्यास, लोकशाहीवरील जनतेचा विश्वास कमी होऊ शकतो.

पत्रकार बंधुच्या वाढदिवसानिमित्त सुरु केला एक उपक्रम एक झाड माझ्या पत्रकार बंधु साठी नाना पाटील सर



प्रतिनिधी/भुसावळ

भुसावळ : भुसावळ शहरातील आवाज जनतेच्या न्युज चॅनेल चे संपादकाच्या वाढदिवसाचे औचित्य साधत

पर्यावरण जागर प्रतिष्ठान चे कार्याध्यक्ष , शैक्षिक आगाज चे राज्य समन्वयक, टिम हिरवांकुर चे जिल्हा अध्यक्ष , हरित भुसावळ स्वच्छ भुसावळ संकल्पना राबविणारे नाना पाटील सर यांनी भुसावळ शहरातील आवाज जनतेचा या न्युज चॅनेल चे संपादक कलिम पायलट यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकार बंधुच्या हस्ते एक वृक्ष माझ्या पत्रकार बंधुसाठी ही संकल्पना मा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्याप्रमाणे एक पेड माँ के लिए याच संकल्पनेवर आधारीत एक पेड पत्रकार बंधु के लिए ही संकल्पना सुरु करून विविध पत्रकार बंधु व नागरिकांच्या माध्यमातून १५ झाडे लावण्यात आली यावेळी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष प्रेम परदेशी लोकमत चे छायाचित्रकार श्याम गोविंदा ,

देशदुतचे मनोहर लोणे सर, संघर्ष माझा न्युज चॅनेल चे संपादक सुनिल आराक, दैनिक महाराष्ट्र सारथी चे नाना पाटील , भाग्यवेद ?केडेमी चे संचालक निळे सर, फालक स्पोर्टचे गामोर फालक, स्झझी क्वीक सर्विस चे संचालक श्री धांडे साहेब व नागरिकांच्या हस्ते ही वृक्षारोपन करण्यात आले .

यावेळी उपस्थित नागरिकांनी व सर्व पत्रकार बंधुनी पत्रकार कलीम पायलट यांना वाढदिवसा निमित्त शुभेच्छा देऊन पत्रकार बंधुसाठी एक झाड या उपकमाचे ही उपस्थित पत्रकार बंधुनी व नागरिकांनी कौतुक केले .

पुणे ते नांदेड रेल्वेतील प्रवाशांना सुरक्षेअभावी वाढता धोका; आरक्षित डब्यात अनारक्षित घुसखोरीला लाचखोर टीटीई जबाबदार

परभणी / दत्तात्रय कराळे

शिक्षणाचे माहेरघर आणि नोकरीच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण शहर म्हणून ओळख असलेल्या पुण्यासाठी रेल्वे प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे. परंतु, पुणे ते नांदेड आणि नांदेड ते पुणे दरम्यान धावणाऱ्या एक्स्प्रेस रेल्वेमधील प्रवाशांची सुरक्षा रामभरोसे बनली गेली आहे. अपुऱ्या सुरेक्षेअभावी सदर रेल्वे गाड्यांमध्ये चोऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. परिणामी प्रवासी भयभीत झाले आहेत.

१८ जुलै रोजी नांदेड येथील एका प्रवाशाची रेल्वेतून कपडे, रोख रक्कम व महत्वपूर्ण अशा कागदपत्रांसह बॅग चोरीला गेली आहे. त्यामुळे सदर प्रवाशाला गंभीर धक्का बसला आहे. या प्रकरणी नांदेड रेल्वे पोलिसांत हरविले गेल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलीस तपास करतील हा भाग वेगळा असला तरी, असे प्रकार घडूच नयेत, यासाठी रेल्वे कडक पाऊल उचलणार आहे का नाही, हा संतापजनक सवाल प्रवासी विचारत आहेत.

नांदेड येथील आकाश धोंडीबा धानोरकर हे १७ जुलै रोजी पुणे जंक्शन येथून रात्री ९.३५ वाजता (गाडी क्रमांक १७६२९) रेल्वेने कोच एस-चार सीट क्रमांक २८ वरून प्रवास करीत होते. दोन्ही सीट मधील मोकळ्या जागेवर त्यांनी निळ्या रंगाची सॅंग बॅग ठेवली होती. त्यात आधारकार्ड, पॅनकार्ड, कॉलेजचे ओळखपत्र, रुपये तीन हजारांची रोकड, टायटन घड्याळ, हेडफोन इत्यादी महत्वपूर्ण असे साहित्य होते. सदर बॅग मनमाड ते छत्रपती संभाजीनगर दरम्यानच्या प्रवासात चोरीला गेल्याचे सांगितले जात आहे. याप्रकरणी आकाश धानोरकर यांनी नांदेड रेल्वे पोलिसात १८ जुलै रोजी दुपारी तक्रार नोंदवली. त्यावरून नांदेड रेल्वे पोलिसांनी हरविले गेल्याची तक्रार दाखल करून पुढील चौकशी सुरू केली आहे.



आरक्षित डब्यात अनारक्षित प्रवाशांची घुसखोरी, त्याला कारणीभूत टीटीईची लाचखोरी

नांदेड-मनमाड, नांदेड-पुणे, नांदेड-सिकंदराबाद, नांदेड-मुंबई आदी लोहमार्गांवरुन धावणाऱ्या सर्वच रेल्वेच्या आरक्षित डब्यात अनारक्षित प्रवाशांचा मुक्त संचार नेहमीच असतो. दोन तीन महिने अगोदर आरक्षण करूनही नागरिकांना सुखाचा प्रवास करता येत नसल्याने, प्रवासी कमालीचे संतप्त होत आहेत. कारण आयत्यावेळी तिकीट काढलेले किंवा ज्यांचे तिकीट कन्फर्म झाले नाही असे किंवा भटके असे जनरल प्रवासी खुलेआम आरक्षित डब्यातून प्रवास करत आरक्षित प्रवाशांना त्रास देत असतात. खेदाची बाब म्हणजे हे सर्व संतापजनक प्रकार केवळ आणि केवळ टीटीईच्या लाचखोरीमुळे घडत असतात. अशा प्रवाशांकडून कर्तव्यावरील टीटीई १०० रुपयांपासून ते ५०० रुपयांची चिरीमिरी घेऊन ते कुठेही बसा म्हणून सरळ मुभा देतात. आपला प्रवास आनंदी व सुखकर व्हावा एवढीच माफक अपेक्षा आरक्षित प्रवाशांची असते. परंतु टीटीईच्या लाचखोरीमुळे अनारक्षित प्रवाशांची घुसखोरी वाढली जाते. आपले उखळ पांढरे करुन टीटीई बिनधास्त असतात. परंतु घुसखोरांकडून मात्र आरक्षित प्रवाशांना रात्रभर कमालीचा त्रास सोसावा लागतो. हे अत्यंत अन्यायकारक असेच म्हणावे लागेल. टीटीईकडून केले जाणाऱ्या अशा घोर व अन्यायी प्रकाराकडे रेल्वे विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कटाक्षाने लक्ष घालण्याची नितांत गरज आहे, अशी मागणी प्रवाशांमधून जोर धरणे स्वाभाविक आहे. पर्यायाने टीटीईंची लाचखोरी व अनारक्षित प्रवाशांची घुसखोरी जो पर्यंत रेल्वे विभागाकडून बंद केली जाणार नाही, तोपर्यंत आरक्षित प्रवाशांना सोसावा लागणारा त्रास आणि भूरट्या चोऱ्यांच्या प्रकारात निश्चितपणे वाढ झाल्याशिवाय राहणार नाही, हे खेदाने सांगणे भाग पडत आहे.

'नांदेड येथील आकाश धोंडीबा धानोरकर हे दि. १७ जुलै रोजी पुणे जंक्शन येथून रात्री ९.३५ वाजता (गाडी क्रमांक १७६२९) रेल्वेने कोच एस-चार सीट क्रमांक २८ वरून प्रवास करीत होते. दोन्ही सीट मधील मोकळ्या असलेल्या जागेवर त्यांनी निळ्या रंगाची सॅंग बॅग ठेवली होती. त्यात आधारकार्ड, पॅनकार्ड, कॉलेजचे ओळखपत्र, रोख तीन हजार रुपये, टायटन घड्याळ, हेडफोन होते. सदर बॅग मनमाड ते छत्रपती संभाजीनगर प्रवासात चोरीला गेली आहे. याप्रकरणी आकाश धानोरकर यांनी नांदेड रेल्वे पोलिसात १८ जुलै रोजी दुपारी तक्रार दिली. त्यावरून नांदेड रेल्वे पोलिसांनी मिसिंग दाखल करून चौकशी सुरू केली.

आरक्षित डब्यात जनरल प्रवासी...

नांदेड मनमाड, नांदेड पुणे, नांदेड सिकंदराबाद, नांदेड मुंबई या लोहमार्गावर धावणाऱ्या सर्वच रेल्वेच्या आरक्षित डब्यात जनरल प्रवाशांचा मुक्त संचार असतो. दोन महिने अगोदर आरक्षण करूनही सुखाचा प्रवास करता येत नसल्याने, प्रवासी संतप्त होत आहेत. कारण जनरलचे प्रवासी खुलेआम आरक्षित डब्यातून प्रवास करत त्रास देतात. या प्रकाराकडे रेल्वे विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणी आता प्रवाशांमधून जोर धरू लागली आहे.

आरपीएफचा रात्री राऊंडच नसतो

नांदेड ते पुणे, पुणे ते नांदेड, नांदेड ते मुंबई या दरम्यान धावणाऱ्या एक्स्प्रेस रेल्वे गाड्यांमधून प्रवाशांच्या बॅगा, महिलांच्या पर्स, मोबाईल, दागिने, रोख रक्कम तथा अन्य किमती वस्तू चोरीला जाण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढीस लागले आहेत. लांब पल्ल्याच्या या गाड्यांमधून रात्रीच्या वेळेला रेल्वेत नियुक्तीवर असलेले सुरक्षा रक्षक, लोह मार्ग पोलीस कर्मचारी व अधिकारी रेल्वेच्या डब्यात फिरकतच नाहीत. कर्तव्यावरील हेच जनतेसाठी संबोधले जाणारे सुरक्षा रक्षक चुकून केव्हा तरी आणि तेही गाडी सुटते तेव्हा फक्त एकदाच सुरुवातीला फेरी मारुन नंतर कुठे गायब होत असतात, ते समजूनच येत नसते. त्यामुळे आरक्षित डब्यात कोणीही यावे आणि कुठेही बसावे असे प्रकार सतत वाढले जातात. त्याचाच परिपाक म्हणून चोरीच्या प्रकारात वाढ तर होतेच त्याशिवाय आरक्षित प्रवाशांनाही फुकट्या घुसखोरांमुळे आपले सामान चोरीला जाईल, या भीतीने धकधक वाढीस लागली जाऊन निश्चिंत अशी झोप घेणेही दूरापास्त होत असते.

एकूणच काय तर प्रधानमंत्री कार्यालय, रेल्वे मंत्रालय, द.म.रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी आणि नांदेड विभागीय नियंत्रक आदींनी या सर्व भयाण अशा प्रकारांकडे कटाक्षाने लक्ष देण्याची नितांत गरज आहे. अन्यथा लाचखोरी, घुसखोरी परिणामी प्रवाशांच्या किमती सामानाची चोरी इ.प्रकार वाढीस लागल्याशिवाय राहणार नाहीत एवढे नक्की..!

लोकनेते दि.बा.पाटील साहेबांनंतर कामगारांना आधार वाटणारा एकमेव नेता महेंद्रशेठ घरत!

दै जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे

उरणः व्ह्रू स्थापनेवेळी प्रकल्पग्रस्त, शेतकरी,कष्टकऱ्यांचे नेते स्वर्गीय लोकनेते दि.बा पाटील साहेबांनी स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरीत प्राधान्य तसेच कामगारांना न्याय देण्याचे काम केले. परंतु पाटील साहेबांच्या निधनानंतर मशरूम सारख्या उगवलेल्या कामगार संघटना व्यवस्थापनांच्या ताटाखालचे मांजर बनून स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांना देशोधडीला लावण्याचे काम करत आहेत. व्ह्रू मधील सफाई कामगार,स्पीडी मल्टीमोटर्स मधील सर्व कामगारांना राष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या रूपाने एकमेव आशेचा किरण दिसत आहे त्यामुळे त्यांनी



महेंद्रशेठ घरत यांच्या न्यू मेरिटाईम अँड जनरल कामगार संघटनेचे सभासदत्व स्विकारले आहे. स्पीडी मल्टीमोटर्स सोनारी या कंपनीचा व्ह्रू बरोबरच्या कराराची मुदत संपत आहे. येथे सात संघटना असल्यामुळे एक - दोन संघटनांना हाताशी धरून बाकीच्या कामगारांना वेठीस धरण्याचे काम स्थानिक व्यवस्थापन करत आहे, त्यामुळे सर्व कामगार एकत्र होवून महेंद्रशेठ घरत यांचे नेतृत्व स्विकारले आहे. व्ह्रू मधील कंत्राटी सफाई कामगारांच्या दोन युनियन असल्यामुळे व्यवस्थापन त्याचा गैरफायदा घेवून त्यांना वाटेल त्या प्रमाणे वागवत आहे. या सर्व कामगारांनी सुद्धा दोन्ही युनियन झिडकारून कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचे नेतृत्व स्विकारले आहे. ३ईं मधे सुरुवातीला महेंद्रशेठ घरत यांची युनियन होती त्यावेळी स्थानिकानाचं नोकरीत प्राधान्य दिले जायचे परंतु स्थानिक पुढाऱ्यांनी निवडणुकी वेळी स्वतःच्या स्वार्थासाठी कामगारांची युनियन तोडली.परंतु तेव्हा पासून परप्रांतीयांची भरती सुरु झाली व स्थानिक कामगारांवर अन्याय होवू लागला. याची जाणीव ३ईं च्या कामगारांना होवून त्यांनी पुन्हा राष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचे नेतृत्व स्विकारले आहे.दि.बा. पाटील साहेबांनंतर स्थानिक कामगारांना राष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत हेच आशेचा किरण दिसत आहेत.

संयुक्त सत्कार व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

सातारा : (अनिल वीर यांजकडून) जिल्हा हिंदी अध्यापक मंडळ व राष्ट्रभाषानुरागी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सत्कार व ४२ वा वार्षिक पुरस्कार समारोह रविवार दि.३ ऑगष्ट रोजी सकाळी ११ वा. येथील राष्ट्रभाषाभवनमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे शिक्षण संचालक महेश पालकर व जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी धनंजय चोपडे व प्रमुख वक्ते प्रा.श्रीधर साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.अध्यक्षस्थान सहकारी संस्थेचे सहाय्यक निबंधक राहुल देशमुख भूषवणार आहेत.

महाराष्ट्र राज्य हिंदी शिक्षक महामंडळ संचालित फेब्रुवारीमध्ये संपन्न झालेल्या इ.



५ वी ते १२ वी पर्यंतच्या राज्यस्तरीय हिंदी सात परीक्षांमध्ये अधिकाधिक विद्यार्थी सहभागी करून हिंदी भाषेच्या प्रचार-प्रसारामध्ये मौलिक योगदान देणाऱ्या जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी विभागातील प्रथम पाच क्रमांक माध्यमिक विद्यालये पुढीलप्रमाणे आहेत.

ग्रामीण - प्रथमः श्री हनुमानगिरी हायस्कूल,पुसेगाव, द्वितीयःपूज्य बापूजी साळुंखे विद्यालय, असवली, तृतीयःभारत विद्या मंदिर, सातारा, चौथाःक.भा. पाटील विद्यालय,भुईंज, पाचवाःव.गुदगे कन्याप्रशाला, मायणी.शहरी : प्रथमः निर्मला कॉन्व्हेंट स्कूल,सातारा, द्वितीयः विठामाता विद्यालय,कराड, तृतीयः अनंत इंग्लिश स्कूल, सातारा, चौथाःके.एस. डी. शानभाग विद्यालय,सातारा व व पाटील विदयालय,रहिमतपूर, पाचवा : त.ल.जोशी विद्यालय, वाई.

परीक्षांच्या माध्यमातून हिंदीच्या प्रचार-प्रसारामध्ये विशेष उल्लेखनीय योगदान देणाऱ्या माध्यमिक विद्यालयांना यावर्षी प्रथमच राष्ट्रभाषा प्रचार-प्रसार पुरस्कार देण्यात येणार आहेत.या पुरस्काराच्या मानकरी ग्रामीण विभागातील ८ व शहरी विभागातील ५ माध्यमिक शाळा पुढीलप्रमाणे आहेत.

ग्रामीण : छ.शिवाजी हायस्कूल, वडूज,श्री.जानुबाई विद्यालय, विरळी,श्री.समर्थ विद्यालय, आर्वी, इंदिरा गांधी विद्यालय, दिवड, न्यू इंग्लिश स्कूल, चिंचणेर-वंदन,श्री समर्थ वि.मं.चाफळ, सिद्धनाथ हायस्कुल म्हसवड,पंचक्रोशी दत्त वि.मं. हेळगाव.शहरी :श्री. पाटील हाय.करंजे पेठ,सातारा,सरस्वती विद्यालय, कोरेगाव,यशवंत हायस्कूल,कराड,मुधोजी हायस्कूल,फलटण.पुरस्कार प्राप्त २५ माध्यमिक विद्यालयाचे हिंदी शिक्षक महामंडळ व सातारा जिल्हा हिंदी मंडळाच्यावतीने पुरस्कार वितरित करण्यात येणार आहेत.तेव्हा सम्बधितांनी वेळेवर उपस्थीत रहावे. असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष ता.का.सूर्यवंशी यांनी केले आहे.

वरठाण येथे श्री संत शिरोमणी सावता माळी पुण्यतिथी उत्साहात साजरी

सोयगाव प्रतिनिधी भावराव मोरे

सोयगाव तालुक्यातील वरठाण येथे माळी समाजाच्या वतीने श्री संत शिरोमणी सावता माळी पुण्यतिथी साजरी करण्यात आली...

श्री संत शिरोमणी सावता माळी यांची प्रतिमा पालखी मध्ये ठेवून प्रथम पुजन बारकु महाजन यांनी केले नंतर टाळ मृदुंग भजन गायन करीत गावभर पालखी सोहळा संपन्न झाला ह्या वर्षी बारकु महाजन यांच्याकडे पुण्यतिथी चे आयोजन करण्यात आले होते शेवटी ग्रामस्थांनी महाप्रसाद लाभ घेतला यावेळी शकंर महाजन, विक्रम महाजन, सुरेश महाजन,अभिमान महाजन,राजेंद्र महाजन,बंन्डू



महाजन,शकंर भगवान महाजन,विठ्ठल महाजन,सजंय महाजन, दयाराम महाजन,आदी तसेच भजनी मंडळ निंबा भोजने,आदेश महाराज, जितू महाजन,राजू भोजने,पंडित जाधव,रमेश शिंपी, सुदर्शन महाराज, राजेंद्र खैरनार,वाल्मीक भोई,राजु भावसार नामदेव सुर्यवंशी, आदी उपस्थित होते

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान शिबिराचे आयोजन

आंबेगाव/प्रतिनिधी

आंबेगाव तालुका मध्य मंडळाच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय मंचर येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले.सकाळी ठीक ८:३० वाजता शिबिराला सुरुवात करण्यात आली, सकाळच्या सत्रामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाहक डॉ.भास्कर भोसले सर व संस्कृत भारती पुणे जिल्हा ग्रामीणचे डॉ.चंद्रकांत देशमुख सर तसेच मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून रक्तदान शिबिराला सुरुवात करण्यात आली.

या शिबिरास एकूण २२७ रक्तदात्यांनी रक्तदान केले, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाहक डॉ.भास्कर भोसले सर म्हणाले अतिशय चांगला



उपक्रम आपण या भागामध्ये राबवला आहे युवकांचा मोठा प्रतिसाद या रक्तदान शिबिराला दिसून आला रक्तदानाचे महत्त्व खऱ्या अर्थाने समाजाला पटवून देण्याचे काम आपल्या माध्यमातून आपण करत आहात असेच काम समाजाच्या हिताचे पुढील काळामध्ये सुद्धा करत रहा.भाजपा जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद म्हणाले,पुष्पगुच्छ किंवा मोठे बॅनर नव्हे,तर रक्तदानाचा संकल्प हाच खऱ्या वाढदिवसाचा अर्थ ही संकल्पना आमच्या सर्व कार्यकर्त्यांसाठी केवळ एक उपक्रम नाही,तर समाजासाठी,जीवदानासाठी आणि सकारात्मक परिवर्तनासाठी प्रेरणा देणारी चळवळ आहे तसेच इ-पुणे ग्रामीण जिल्ह्यातील सर्वात मोठे रक्तदान हे आंबेगाव मध्य मंडलांमध्ये मंचर शहरात संपन्न झाले आहे,यानिमित्ताने संजय थोरात व तालुकाध्यक्ष स्नेहल चासकर यांचे आम्ही विशेष आभार मानतो संजय थोरात यांचे काम खूप चांगल्या पद्धतीने या भागामध्ये चालू आहे गोरगरिबांना मोफत योजना ते सातत्याने पोचवतात त्यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमी आहे. या उपक्रमास शिवनेरी ब्लड बँक, राणाप्रताप संस्था,एस.न फिटनेस क्लब,राजपथ करियर अकॅडमी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

यावेळी भाजपा नेते भानुदास नाना काळे,विजयराव पवार,रविंद्र काका त्रिवेदी,संतोष खामकर,तालुकाध्यक्ष स्नेहल चासकर,मा.सरपंच प्रमिलाताई निराळे,भास्कररराव सावंत,महेश थोरात,गणेश राऊत,मोहन लोखंडे,जयेश काळे,गणेश थोरात,कालिदास गांजाळे,भरत काळे,सुरेश अभंग,सुनील कहडने,शिवाजी बारवे,प्रवीण डोके,बाबाजी खानदेशे,संतोष आंबटकर,सुभाष मावकर,अंकुश थोरात,संतोष थोरात,अक्षय थोरात,सुनीत थोरात,सुदर्शन चपटे,संतोष इंदोर,विजय शिंदे,प्रितेश गांधी, संग्राम सावंत,संदीप सावंत,प्रशांत मोरडे,डॉ राकेश काजळे,अर्चना बुट्टे,निर्मला भालेराव,वैष्णवी गुंजाळ,सुषमा थोरात,सुजाता घुले तसेच पत्रकार बांधव व मोठ्या संख्येने पदाधिकारी तरुण सहकारी उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाची प्रस्तावना भाजप नेते जनसेवक संजय थोरात यांनी केली, सूत्रसंचालन नवनाथ थोरात व आभार स्नेहल चासकर यांनी मानले..

वेळात वेळ काढून रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे, डॉक्टर्स व त्यांच्या सहकाऱ्यांचे तसेच उपस्थित पदाधिकारी व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक आभार मानले.

घरकुल बांधकामाचे पैसे मिळत नसल्याने नारायण गायकवाड यांनी केले बिडिओच्या दलनात ठिय्या आंदोलन

कंधार प्रतिनिधी/ संतोष कांबळे

शासनाच्या वतीने ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांना घर मिळावे यासाठी घरकुल योजना मोठ्या प्रमाणात राबवली जात आहे. घरकुल मंजूर झाल्याने लाभार्थी आनंदित होत आहे परंतु काम करू नये अधिकारी घरकुलाचे बिल काढण्यात टाळाटाळ करत असल्याने घरकुल मिळालेत कशाला?अशी निराशाजनक भावना व्यक्त करत आहे. एकीकडे घरकुलासाठी अर्ज मागवणे मोठ्या प्रमाणात चालू असताना २०१६- १७ मध्ये बांधकाम केलेल्या घरकुलाचे आजही पैसे मिळाले नसल्याने लाभार्थी मोठ्या चिंतेत सापडले आहेत. पेठवडज ग्रामपंचायत अंतर्गत २०१६ ते १७ मध्ये गेलेले घरकुलचे कामे पूर्ण झाले असतानाही त्याचे अद्यापही बिल निघाले नाही. ग्रामपंचायत



कार्यालयाकडून वारंवार पंचायत समिती कार्यालयाकडे पाठपुरावा करूनही याकडे दुर्लक्ष केल्या जात असल्याने, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नारायण गायकवाड यांनी चक्क बिडिओच्या दलनात आंदोलन केले.

शासनाकडून घरकुल योजनेसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज मागवले जात आहे. या घरकुलाचे बिल काढण्यास संबंधित अधिकारी हे पैसे मागत असल्याच्या अनेक तक्रारी समोर येत आहेत. घरकुल योजनेमध्ये लाभार्थ्यांपेक्षा संबंधित अधिकाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात फायदा होत असल्याच्या जोरदार चर्चा सध्या चालू आहेत. कंधार तालुक्यात अनेक ठिकाणी घरकुल न बांधताच अधिकाऱ्यांना मॅनेज करून बिल उचलल्याच्याही तक्रारी समोर आले आहेत. ज्या लाभार्थ्याने पूर्णपणे प्रामाणिकपणे घर घरकुल बांधले आहे अशा लोकांना मात्र बिले काढण्यास टाळाटाळ केली जात असल्याचेही आरोपही केल्या जात आहे. शासनाकडून रेती देण्याचे आश्वासनही देण्यात आले होते परंतु ही रेती बघायला सुद्धा मिळत नाही अशी अवस्था घरकुल योजनेची झाली आहे. सन २०१६ -१७ पासून पेठवडज या गावांमध्ये जवळपास दोन हजार घरकुल मंजूर झाले असून त्याचे बिल निघत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. ग्रामपंचायत कार्यालयाकडून अनेक वेळा बिल दाखल करूनही बिल मिळत नसल्याने लाभार्थी हे ग्रामपंचायती व सरपंचाकडे चक्रा मारून पैसे उचलून खाल्ल्याची बदनामी करत आहेत.त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी गावात येऊन सर्व घरकुल लाभधारकांना बोलवून त्यांना खरं काय आहे हे सांगून त्यांचे समाधान करावे या मागणीसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नारायण गायकवाड यांनी गटविकास अधिकारी यांच्या दलनात बसून काही वेळ आंदोलन केले.यावर अधिकारी यांनी गावात येऊन सविस्तर माहिती देण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले..

वाघोली डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ नारायण ताठे व सचिवपदी डॉ रवी धायगुडे यांची निवड; असोसिएशनची कार्यकारिणी जाहीर

दैनिक जनप्रभात प्रतिनिधी - स्वरूप गिरमकर

(पुणे) वाघोली : वाघोली डॉक्टर्स असोसिएशनच्या २० जुलै २०२५ रोजी हॉटेल हिंदुस्तान इंटरनॅशनल, विमाननगर, पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये पुढील एक वर्षांसाठी २०२५ ते २०२६ सालासाठी पुढील डॉक्टरांची सर्वानुमते सर्व २६५ सदस्यांनी एकमताने निवड करण्यात आली अशी माहिती असोसिएशनचे संस्थापक डॉ विनोद सातव पाटील यांनी दिली.

वाघोली डॉक्टर्स असोसिएशनच्या नवनिर्वाचित अध्यक्षपदी ताठे हॉस्पिटलचे डॉ नारायण ताठे, सचिवपदी डॉ रवी धायगुडे, कोषपाल डॉ ऋषिकेश सूर्यवंशी, उपाध्यक्ष डॉ राहुल शिंदे आणि डॉ ज्ञानेश्वर खरात, सहसचिव डॉ अभिजीत लांडगे, सहकोषपाल डॉ सतीश मेहेरे, तसेच विविध कमिटीवर विविध डॉक्टरांची निवड करण्यात



आली.

सोशियल आणि सांस्कृतिक कमिटी - डॉ अमृता विधाते, डॉ ऋचा कोलते, डॉ वर्षा दवणे, डॉ रवींद्र साळवे, डॉ संतोष सांगोळे. स्पोर्ट्स कमिटी - डॉ श्रीनिवास मैंदाड, डॉ नितीन पवार, डॉ राहुल दिवेकर, डॉ अजय गिरी. मेडीकोलिगल कमिटी - डॉ स्मिता कोलते, डॉ मयुरा बेहेळे, डॉ विजयकुमार गुट्टे, डॉ सुनील गुप्ता. वुमेन्स फोरम - डॉ अमृता कोटंबे, डॉ पूनम गुप्ता, डॉ स्वाती कळसकर, डॉ पद्मा कहाटे स्विकृत सदस्य - डॉ पल्लवी मेहेरे, डॉ घनश्री शिंदे, डॉ दीप्ती ताठे, डॉ संध्या कराळे, डॉ सुरेश नागवडे, डॉ महेश सोळंकी. असोसिएशनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम असोसिएशनचे हे चौदावे वर्ष असून २६५ सदस्यसंख्या आहे. असोसिएशनच्या माध्यमातून वेगवेगळे सिएमई, आरोग्यशिबिरे, डॉक्टर्स डे, स्पोर्ट्स व सांस्कृतिक कार्यक्रम, साथीच्या आजारांविषयी जनजागृती, बोगस डॉक्टर पकडून देणे, सहली यांचे आयोजन केले जाते.

फुकटचे श्रेय लाटणारे नेते स्वतःचे हसून करून घेत आहे -आ. सुमित वानखेडे

आष्टी (श)वर्धा ■ प्रतिनिधी



आष्टी(श.): महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २२ जुलै ला महारक्तदान शिबीराचे आयोजन आष्टी येथील भाजपच्या जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात भारतीय जनता पार्टीच्या १०१ कार्यकर्त्यांकडून रक्तदान करीत सामाजीक बांधीलकी जोपासण्याचे मोठे उदाहरण समाजापुढे ठेवले आहे. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टीच्या आष्टी येथील नवीन पक्ष कार्यालयाचे उद्घाटन देखील,आमदार सुमित वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

राजकारणासोबतच समाजकार्य हीच खरी कृतज्ञता या भावनेतूनच आष्टीत १०१ भाजपच्या युवा व जेष्ठ कार्यकर्त्यांनी रक्तदान करुन,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस साजरा केला. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून भारतीय जनता पक्षाचे आष्टी तालुक्याचे जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन आमदार सुमित वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आष्टी तालुक्याचे भाजपचे पहीले तालुकाध्यक्ष उत्तमराव करांगळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार सुमित वानखेडे यांनी आष्टी तालुक्यातील तळेगाव(श्या.) येथे ३०० बेड्सच्या रुग्णालयासाठी प्रशासकीय मान्यता मिळवुन देत १५५ कोटी रुपयांचा निधी मंजुर करून दिल्या बद्दल पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून आमदार वानखेडेंचा जाहीर सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार सुमित वानखेडे यांनी उपस्थितीत कार्यकर्त्यांना संबोधीत केले. ते म्हणाले वानखेडे रक्तदानातुन आपन सामाजीक बांधीलकी जोपासत समाजापुढे मोठे उदाहरण ठेवले आहे. भाजपाच्या आष्टी येथील जनसंपर्क कार्यालयातुन गोर-गरीब जनतेची कामे करण्यात येणार आहे. वानखेडे पुढे म्हणाले, तळेगावच्या रुग्णालयाला १५५ कोटींचा निधी मंजुर झाल्याने,रुग्णालयाची सुसज्ज इमारत आता उभारली जाणार आहे. याचा मोठा फायदा आर्वी विधानसभेतील गोर गरीब जनतेला होणारच आहे. तर आजुबाच्या जिल्ह्यातील नागरिकांना देखील होणार आहे. काही नेते रुग्णालय मंजूर करून आणल्याचे फुकटचे श्रेय लादण्याचा प्रयत्नावर ते स्वतःचेच हसे करून घेत असल्याची टीका आमदार सुमित वानखेडे यांनी यावेळी केली. खासदार अमर काळेंनी या संदर्भात प्रसार माध्यमांतून एक पोस्ट टाकलेली आहे. कि,या रुग्णालयाला मान्यता खासदार काळेंनी मिळवुन दिली. परंतु जनता आता हुषार झाली आहे ती दूधखूडी नाही, त्यांना कळत कि,या रुग्णालयाला मंजुरी दस्तुरखुद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना दिलेली आहे.

यावेळी कार्यक्रमाला आमदार सुमित वानखेडे, जिल्हा महामंत्री अशोक विजय कर भाजपा आष्टी तालुकाध्यक्ष सचिन होले,उत्तमराव करांगळे,विजय वाजपयी,कमलाकर निंभोरकर,देवानंद डोळस,प्रशांत काकपुरे, रामदासजी लव्हाळे, नरेंद्र भनेरकर, संजय ठाकरे उत्तमराव बर्गे विशाल गाडगे,अनिरुध्द दंडाळे,अतुल गुल्हाने,सचिन गुप्ता, किशनसिंग चौहान,श्रीराम ठोंबरे, प्रमोद कापसे, योगेंद्र मतले,शरीफ पठाण,आकाश भगत आशिष खोपे साहिल ठाकरे, धीरज भिवापूरे यांसह अन्य भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला तसेच रक्तपेढी उपलब्ध करून देणाऱ्या जीवन ज्योती चे संचालक डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांचे भाजपच्या वतिने आभार मानण्यात आले कार्यक्रमाचे संचालन देवानंद डोळस आभार प्रदर्शन विशाल गाडगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाजपा युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम उचलले.

सुर्यपूत्र शनिदेव जन्मोउत्सव निमित्ताने शनिदेव तेला अभिषेक आयोजित

वर्धा ■ प्रतिनिधी



श्रावण महिन्यातील श्री हरीयाली अमावास्येच्या पवित्र दिवशी सुर्यपूत्र शनिदेव यांची सुर्यमंडळात जन्म झाला. त्यामुळे या मुहूर्तावर आर्वी येथील पद्मावती चौकातील प्राचीन शनिमंदिरात दरवर्षी श्री शनिदेव जन्मोउत्सव साजरा करण्यात येतो. याही वर्षी श्री शनिदेव जन्मोउत्सवा निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे व अनुष्ठानांचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रह दोष निवारणार्थ शनिकृपेचे अनुष्ठान ठेवले आहे. दिनांक २४/०७/२०२५ गुरुवार रोजी शनिदेव तेला अभिषेक सकाळी ७:३० वाजे पासून दुपारी १ वाजेपर्यंत होणार आहे. सोबतच श्री शनिदेव श्रृंगार महा आरती, श्री शनिदेव श्रृंगार श्रावण पाळणा दर्शन आणि भजनाचा कार्यक्रम त्याच दिवशी आयोजित करण्यात आला आहे. श्री शनिदेव श्रृंगार पाळणा दर्शन आणि महाआरती प्राचीन शनिमंदिरात सायंकाळी ७:३० वाजता होणार आहे.

दिनांक २५/०७/२०२५ शुक्रवार प्रताप भवन शनिमंदिर वार्ड आर्वी येथे भाविक भक्तांसाठी दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पवित्र श्रावण महिन्याच्या हरियाली अमावस्येचे धार्मिक दृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे श्री शनिदेव जन्मोउत्सवाच्या निमित्ताने आयोजित सर्व धार्मिक कार्यक्रमात सहभागी होऊन सक्रियतेने सहकार्य करावे तसेच आयोजित महाप्रसादाचा लाभ घ्यावा अशी विनंती पंडित मुन्नालाल महाराज व प्रा. मनोज ए. गोडबोले यांनी भाविक भक्तांना केली आहे.

अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांनी मिनी ट्रॅक्टर पुरवठा अर्ज सादर करावी

भंडारा ■ प्रतिनिधी

भंडारा, : सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग निर्णय क्र. एटीटीएस २०१६/ प्र.अ.१२०५/ अजाक दि. ८ मार्च २०१७ नुसार 'अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवणे या योजनेत आमुलाग्र बदल करण्यात आला असून सदर योजनेअंतर्गत ज्या लाभार्थी बचत गटाला देण्यात येणारे (अर्थसहाय्य) हे वस्तू स्वरुपात न देता मंजुर अर्थसहाय्य हे रक्कम रू. ३.१५ लाख गचत गटाच्या आधार संलग्न बँक खात्यात ङ्मर्ईं द्वारे जमा करण्यात येणार आहे.

या योजनेच्या अटी शर्ती खालील प्रमाणे आहे. स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्राचे रहिवासी असावे. स्वयंसहाय्यता बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकातील असावेत. स्वयंसहाय्यता बचत गटाचे अध्यक्ष व सचिव हे अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील असावेत. बचत गटाचे राष्ट्रीयकृत बँकेत बचत गटाच्या नावे बँक खाते असावे व सदरचे बँक खाते बचत गटाचे अध्यक्ष व सचिव यांचे आधार क्रमांकाशी संलग्न असावे. स्वयंसहाय्यता बचत गटाने खरेदी केलेला मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने ही भारत सरकारचे यांनी निर्धारित केल्यानुसार फार्म, मशिनरी, ट्रेनिंग आणि टेस्टींग इन्स्टीट्यूट यांनी टेस्ट करुन जाहीर केलेल्या उत्पादकांच्या यादीतील परिमाणानुसार असावेत.

पात्र स्वयंसहाय्यता बचत गटांना शासनाने त्या त्या जिल्ह्यासाठी निश्चित करुन दिलेल्या उदिष्टांनुसार अर्थसहाय्य मंजुर करुन त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

योजनेच्या लाभासाठी निवड झालेल्या निवड झालेल्या स्वयंसहाय्यताबचत गटाला त्यांनी खरेदी केलेले मिनी ट्रॅक्टर चालविण्याचे अधिकृत संस्थेकडून प्रशिक्षण घेणे व त्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. स्वयंसहाय्यता बचत गटाने खरेदी केलेले मिनी ट्रॅक्टर/ट्रॅक्टर व उपसाधने अर्थसहाय्य घेतल्यानंतर सदर मिनी ट्रॅक्टर / व त्याची उपसाधने विकता येणार नाही किंवा गहाण ठेवता येणार नाही. तशा आशयाचे हमीपत्र स्वयंसहाय्यता बचत गटाला द्यावे लागेल. तसेच पुढे प्रत्येक वर्षी १० वर्षापर्यंत त्याबाबत प्रमाणपत्रास मंजुरी देणाऱ्या सक्षम प्राधीका-याकडे सादर करणे बंधनकारक असेल. ज्या स्वयंसहाय्यता बचत गटांनी पॉवर ट्रिलर किंवा मिनी ट्रॅक्टर योजनेचा लाभ घेतला आहे, त्या बचत गटांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

वरील योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र स्वयंसहाय्यता बचत गटांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,जिल्हा परिषद चौक, भंडारा येथे संपर्क साधून अर्ज सादर करण्यात यावे. असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,भंडारा विभागानी कळविले आहे.

वर्धा येथे राज्यस्तरीय पत्रकार संम्मेलनाचे आयोजन



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : येथील शासकीय विश्रामगृह येथे २३ जुलै रोजी दुपारी एक वाजता पत्रकार संरक्षण समिती द्वारे राज्यस्तरीय पत्रकार संम्मेलन आयोजित करण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत १७ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय पत्रकार संमेलन घेण्याची तारीख निश्चित करण्यात आली. या तारखेला प्रमुख पाहुणे व त्याचे नियोजन कसे करायचे याबाबत बैठकीत मंथन करण्यात आले. राज्यस्तरीय पत्रकार संमेलनाकरिता पालकमंत्री डॉ .पंकज भोयर व इतर पदाधिकारी, अधिकारी यांना निमंत्रित करण्याचे नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला पत्रकार संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे , विदर्भ उपाध्यक्ष रवि घुमे यांच्या मार्गदर्शनात जिल्हाध्यक्ष बाळासाहेब चतारे कार्याध्यक्ष शेख सत्तार ग्रामीण अध्यक्ष संदीप रघाटाटे सचिव योगेश कांबळे सहसचिव सतीश काळे व इतर पदाधिकारी प्रविण करोले,रवि साखरे, बाळा वाघ,विनोद घोडे ,राहूल मुन, गजानन जिकार,प्रशांत जीतू गोरडे प्रशांत आजनकर प्रमोद बोरकर याच्यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते .

धान खरेदी पूर्ण होईपर्यंत उद्दिष्ट वाढवा; खा. पडोळेंची कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडे मागणी

भंडारा ■ प्रतिनिधी

सरकारी खरेदी केंद्रांवर संथ गतीने खरेदी; शेवटच्या दाण्यापर्यंत खरेदी सुनिश्चित करा



प्रतिनिधी : भंडारा - धान उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा, यासाठी शासनाकडून जिल्हा मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळामार्फत धान खरेदी केली जाते. मात्र, यावर्षी खरेदीचे उद्दिष्ट कमी मिळाल्याने भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील अनेक शेतकरी धान विक्रीपासून वंचित राहिले आहेत. शासनाने दिलेले सुरुवातीचे उद्दिष्ट संपल्यानंतर ते वाढवण्यात आले, परंतु तेही आठवडाभरातच पूर्ण झाल्याने खरेदी थांबली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा उद्दिष्ट वाढवून देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून जोर धरू लागली आहे. याच पार्श्वभूमीवर, खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांना पत्र लिहून तातडीने उद्दिष्ट वाढवण्याची मागणी केली आहे. याविषयी बोलताना खा. डॉ. प्रशांत पडोळे म्हणाले, 'शेतकऱ्यांचे संपूर्ण धान शासकीय केंद्रांवरच विकले जाणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांना मोठा आर्थिक फटका बसेल. दोन्ही जिल्ह्यांतील शेवटच्या दाण्याची खरेदी होईपर्यंत वाढीव उद्दिष्ट मिळायलाच हवे. सरकार उद्दिष्ट वाढवल्याचा दावा करते, पण प्रत्यक्षात खरेदी संथ गतीने आणि टप्प्याटप्प्याने होत असल्यामुळे शेतकऱ्यांना ताटकळत राहावे लागते. याच दिरंगाईमुळे शेतकरी नाइलाजाने व्यापाऱ्यांना धान विकतो. त्यामुळे उद्दिष्ट वाढवणे हे केवळ कागदोपत्री असून, 'सरकारचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे' असा हा प्रकार आहे.' ते पुढे म्हणाले, 'उद्दिष्ट टप्प्याटप्प्याने वाढवण्याच्या धोरणामुळे शेतकऱ्यांपुढे खासगी व्यापाऱ्यांना कवडीमोल भावात धान विकण्याशिवाय पर्याय उरत नाही. शासकीय केंद्रांवर धान विकल्यावरही पैसे वेळेवर मिळत नाहीत. वर्षभराचा खर्च भागवण्यासाठी सरकारकडून उशिरा मिळणाऱ्या पैशांपेक्षा व्यापाऱ्यांकडून मिळणारे कमी पण वेळेवरचे पैसे शेतकऱ्याला अधिक महत्त्वाचे वाटतात. सरकारकडून दिला जाणारा बोनसही पुरेसा नाही. शेतकऱ्यांच्या धानाला योग्य भाव आणि त्याचे पैसे वेळेवर मिळणे, हे सर्वात महत्त्वाचे आहे,' असेही खा. पडोळे यांनी स्पष्ट केले.

रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे लोकमान्य टिळक जयंती साजरी

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी : छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली . याप्रसंगी व्यासपीठावर कार्यकारी प्राचार्या डॉ. अर्चना कहाळे पत्की, आय क्यू एस सी समन्वयक प्रा. पंकज झगडे, सर्व शाखेचे विभाग प्रमुख प्रा. दीपक ठाकरे, बीसीसीए विभाग प्रमुख प्रा. किरण पांडे, कला शाखा विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी, बीएससी विभाग प्रमुख स्वाती इंगळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. हर्षल रोठे, प्रा. वर्षा सातपुते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी माता सरस्वती आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. संगीत विभाग प्रमुख प्रा. सचिन देशमुख यांनी लोकमान्य टिळकांवर आधारित एक गीत सादर केले.

टिळकांनी केवळ राजकारण नव्हे तर समाज प्रबोधन आणि शिक्षणाच्या माध्यमातून जनतेला जागृत केले अशा थोर नेत्यांचा आदर्श आणि विचार आपल्या जीवनात आचरणात आणला पाहिजे असे वक्तव्य प्रास्ताविकाच्या माध्यमातून प्रा. संजय पाठक यांनी केले. कला शाखा विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी यांनी टिळकांचे विचार खूप प्रेरणादायी आहे त्या विचारांचे अनुकरण कसे करावे असे मत प्रतिपादन केले. प्रा. किरण पांडे, प्रा. सुषमा वडस्कर यांनी लोकमान्य टिळकांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा. डॉ. अर्चना कहाळे पत्की यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक सचिव मा. डॉ. मारोती वाघ पण संस्थेच्या संचालिका लता वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमचे सूत्रसंचालन प्रा. हर्षल रोठे यांनी केले. आभार प्रा. पुनम मेश्राम यांनी मानले. विद्यार्थ्यांच्या व प्राध्यापक वृंद यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

लहान आर्वीत संत्रा फळगळीने शेतकर्यांचे नुकसान ; कृषी विभागाचे दुर्लक्ष पंचनामे करण्यासाठी ग्रामपंचायतचे वतीने तहसिलदारांना निवेदन

लहान आर्वी ■ सुनिल साबळे



लहान आर्वी : आष्टी तालुक्यातील लहान आर्वी ग्रामपंचायत कक्षेत येत असलेल्या विविध मौजातील शेतकर्यांच्या बागेतील संत्रांची मोठ्या प्रमाणात फळगळ सुरू झाली आहे. यामुळे शेतकर्यांवर पुन्हा नव्याने संकटं उभे झाले आहे.

लग्रालहान आर्वी ग्रापंचायत कक्षेतील मौजा लहान आर्वी , मौजा लिंगापूर ,मौजा सुजातपूर, मौजा विठ्ठलापूर आणि मौजा चेकबंदी आणि जैतापूर या शिवारात ९०इशेतकऱ्यांची संत्रा बागायत शेती आहे. यावर्षी २८ मे नंतर अवकाळी पाऊस गेल्या नंतर मान्सुन पाऊस सुद्धा अल्प प्रमाणात झाला आहे. त्यामुळे संत्रा झाडांमध्ये मोठ्या प्रमाणात उष्णतामान तयार झाल्याने वातावरणीय बदल आणि त्या बदलाचा परिणाम संत्रा बागेवर झाल्याने संत्र गळती मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. अलीकडे उन्हाळाभर अवकाळी पाऊस आणि मान्सून लांबल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले. तर दुसरीकडे संत्रा बागायतदार शेतकऱ्यांवर संत्रा गळतीचे फळगडीचे संकट आले आहे. यामुळे लहान अर्वी ग्रामपंचायत कक्षेतील सर्व शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे लहान आर्वी ग्रामपंचायतचे सरपंच सुनिल साबळे आणि उपसरपंच अमोल होले यांनी सर्व शेतकऱ्यांना सोबत घेऊन ग्रामपंचायतचे वतीने तहसिलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पंचनामे करून आर्थिक नुकसान भरपाई मिळण्यासाठी नुकतेच निवेदन दिले आहे.

निवेदन देतेवेळी वैभव पाटील,निलेश भेदे ,वैभव चरडे, भूषण मोहड, सतीश मख,देविदास खेरडे ,सुरेश खेरडे, किसनराव बानाईत,मनोज गावनेर, दिलीप निंभोरकर ,रघुनाथ गायकी, सुधाकर राऊत ,मधुकर वाटकर, प्रभाकर पाटील ,वसंतराव गावनेर, मारोतराव खासबागे, चंद्रशेखर निघोट, आनंदराव अकोलकर, बाबारावजी लांडे, रवींद्र हमाने, बाबारावजी ढोक, हरीष होले ,वैभव पाटील ,रुपेश खासबागे यासह असंख्य शेकडो शेतकरी उपस्थित होते.

केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था - सीसीआरआय नागपूरतर्फे मध्यप्रदेशातील शाजापूर जिल्ह्यामधील लिंबूवर्गीय फळ उत्पादकांसाठी ३ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : मध्यप्रदेशातील शाजापूर जिल्ह्यामधील लिंबूवर्गीय फळ उत्पादकांसाठी १५-१७ जुलै दरम्यान केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या अधिन असणाऱ्या नागपूर येथील अमरावती रोड स्थित-केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था नागपूरतर्फे तीन दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात एकूण २७ लिंबूवर्गीय फळ उत्पादक सहभागी झाले. हा प्रशिक्षण कार्यक्रम कृषी आणि प्रक्रिया केलेले खाद्य उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण - अपेडा प्रायोजित प्रकल्प 'लिंबूवर्गीय शेतकऱ्यांसाठी चांगल्या कृषी पद्धतींचा अवलंब : क्षमता विकास कार्यक्रम' अंतर्गत आयोजित करण्यात आला होता. आयसीएआर-सीसीआरआय, नागपूरचे संचालक डॉ. दिलीप घोष यांनी प्रास्ताविक केले आणि रोगमुक्त लागवड साहित्याच्या उत्पादनासंबंधी संस्थेच्या तंत्रज्ञानावर प्रकाश टाकला. डॉ. घोष यांनी शेतकऱ्यांना लिंबूवर्गीय फळ लागवडीसाठी शास्त्रोक्त पद्धतींचा अवलंब करण्यास आणि लिंबूवर्गीय फळ बागांमध्ये आंतरपीके टाळण्यास सांगितले. यामुळे झाडांवर योग्य ताण पडेल आणि वेळेवर फुले येतील.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, कृषी वैज्ञानिक निवड मंडळ नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष प्रा. सी. डी. मायी होते. त्यांनी प्रशिक्षणार्थींना सरकारी योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी समूह (क्लस्टर) तयार करण्याचे आवाहन केले. सन्माननीय अतिथी, डॉ. मुकेश सिंग, शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, शाजापूर यांनी शेतकऱ्यांना ३ दिवसांच्या अभ्यासक्रमात लिंबूवर्गीय फळ पीकांच्या सर्व पैलूंबद्दल जाणून घेण्याचे आवाहन केले.

तांत्रिक सत्रांमध्ये आयसीएआर-सीसीआरआयच्या शास्त्रज्ञांनी लिंबूवर्गीय फळांच्या लागवडीसंबंधी विविध महत्त्वाच्या पैलूंवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. दर्शन कदम यांनी लिंबूवर्गीय फळबागांची स्थापना आणि व्यवस्थापन, डॉ. ए. थिरुज्ञानावेल यांनी रोपवाटिका स्थापना, डॉ. सुरजित मोंडल यांनी लिंबूवर्गीय फळांचे पोषण व्यवस्थापन, डॉ. ए. के. दास यांनी लिंबूवर्गीय फळांचे रोग व्यवस्थापन, डॉ. एन. एम. मेश्राम यांनी कीटक व्यवस्थापन, डॉ. के. के. कोम्मू यांनी लिंबूवर्गीय फळबागांमधील नेमाटोड व्यवस्थापन, डॉ. वेंकटरामन बनसोडे यांनी लिंबूवर्गीय फळांच्या तोडणीनंतरच्या व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले आणि लिंबूवर्गीय फळांच्या पॅकिंग लाइनचे प्रात्यक्षिक दाखवले. डॉ. संगीता भट्टाचार्य यांनी शेतकऱ्यांना लिंबूवर्गीय फळ बागांचा ऱ्हास आणि संबंधित पुनरुज्जीवन तंत्रज्ञानाबद्दल जागरूक केले. डॉ. जे. पी. तेजकुमार यांनी वनस्पती प्रजाती आणि शेतकरी अधिकार प्राधिकरण च्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून झाडांच्या जातींचे संरक्षण करण्याबाबत शेतकऱ्यांना जागरूक केले. डॉ. यू. आर. सांगळे आणि डॉ. अशोक कुमार यांनी बोर्डो मिश्रण तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले.

शेतकऱ्यांना प्रशिक्षण पुस्तिका आणि 'लिंबूवर्गीय रोग आणि कीटकांची पॉकेट डायरी' वाटण्यात आली. या कार्यक्रमात आयसीएआर-सीसीआरआयच्या रोपवाटिका व प्रायोगिक भूखंड भेट देणे, आणि कीट व कीटक ओळखणे यांचा समावेश होता. प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांची नागपुरातील हेटीकुंडी जवळील व्यावसायिक आणि प्रगतीशील लिंबूवर्गीय फळ उत्पादक श्री. केवलरमानी यांच्या बागेला देखील भेट देण्यात आली. डॉ. मुकेश सिंग हे कृषी विज्ञान केंद्र (केव्हीके) शाजापूरचे समन्वयक होते आणि डॉ. संगीता भट्टाचार्य या आयसीएआर-सीसीआरआय., नागपूरच्या प्रशिक्षण समन्वयक होत्या. समारोप सत्र आणि प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांच्या वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

प्रहार मिलिटरी स्कूलमध्ये कारगिल विजय दिवस सप्ताह निमित्त 'ऑपरेशन सिंदूर' कार्यक्रम उत्साहात संपन्न

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : कारगिल विजय सप्ताह निमित्ताने प्रहार मिलिटरी स्कूल, रवी नगर येथे 'ऑपरेशन सिंदूर' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शौर्य आणि लष्करी जाणिवा जागवण्यासाठी घेण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे ब्रिगेडियर सुहास कुलकर्णी (निवृत्त) यांचे विद्यार्थ्यांशी थेट संवाद. त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'सारख्या लष्करी मोहिमांचा संदर्भ देत भारताच्या सर्जिकल क्षमतांबद्दल विद्यार्थ्यांना अत्यंत प्रभावीपणे मार्गदर्शन केले. त्यांच्या अनुभवसमृद्ध संवादातून विद्यार्थ्यांच्या मनात देशसेवेची प्रेरणा जागी झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रहार मिलिटरी शाळेचे उपाध्यक्ष श्री भालचंद्र कागभट, एमबीए डिपार्टमेंटचे हेड श्री भावे सर तसेच मुख्याध्यापिका श्रीमती वंदना कुलकर्णी यांचीही कार्यक्रमात विशेष उपस्थिती लाभली. मान्यवरांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना शिस्त, देशप्रेम आणि जबाबदारीची जाणीव करून दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुसंगत आणि प्रभावी पद्धतीने करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या सत्रात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला व उपस्थित मान्यवरांना प्रश्न विचारून संवाद अधिक समृद्ध केला.

कारगिल विजय सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित केलेला 'ऑपरेशन सिंदूर' कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ माहितीपर नव्हे, तर जीवनमूल्यांची प्रेरणा देणारा ठरला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पारदर्शक व निर्भय पारपडतील असे नियोजन करा : राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच महानगर पालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांना आपला मतदानाचा हक्क सूलभपणे बजावता यावा तसेच निवडणूक प्रकिया पारदर्शक व निर्भयपणे पारपाडण्यासाठी आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज दिल्यात.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात नागपूर विभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा श्री. वाघमारे यांनी घेतला. त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, तसेच नागपूर विभागातील सर्व जिल्हाधिकारी, नागपूर व चंद्रपूर महानगर पालिका आयुक्त, जिल्हा उपनिवडणूक अधिकारी तसेच निवडणुकी संदर्भातील सर्व यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा परिषद, ५५ नगर परिषद व नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका तसेच नागपूर व चंद्रपूर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणुकी संदर्भात जिल्हा प्रशासनाच्या पूर्वतयारीचा आढावा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी घेतला. या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आवश्यक मनुष्यबळ, इलेक्ट्रॉनिक्स मतदान यंत्र, एकूण मतदारांची संख्या त्यानुसार मतदान केंद्रांची रचना करतांना मतदारांना सूलभपणे मतदान करता यावे, यादृष्टीने मतदान यादी तयार करण्यास प्राधान्य देण्याच्या सूचना, श्री. वाघमारे यांनी यावेळी दिल्या.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनानुसार मतदार संख्येमध्ये झालेल्या वाढीनुसार मतदान केंद्रामध्ये वाढ करण्यात यावी तसेच मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा निर्माण करतांना दिव्यांग मतदारांना मतदान करतांना अडचण जाणार नाही याची खबरदारी घ्यावी, तसेच आदर्श मतदान केंद्र, पिंक मतदार केंद्र तयार करावे. मतदारांना मतदान करतांना अडचण जाणार नाही यादृष्टीनेही आवश्यक तयारी करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी दिल्या. मतदान यादीचे मतदान केंद्रनिहाय विभाजन करतांना १ जुलै २०२५ ची यादी ग्राहय धरण्यात येईल, असेही ते म्हणाले.

मध्यप्रदेश राज्य निवडणूक आयोगासोबत करार करण्यात आला आहे, त्यानुसार मतदान यंत्र उपलब्ध होणार आहेत. तसेच ईसीआयकडून ५० हजार कंट्रोल युनिट तसेच १ लक्ष बॅलेट युनिटची मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार इलेक्ट्रॉनिक्स मतदान यंत्राची वाहतूक करावी. तसेच मतदान यंत्र ठेवण्यासाठी आवश्यक शासकीय गोदामाची व्यवस्था करावी, प्रत्यक्ष मतदानापूर्वी मतदान यंत्रांची तपासणी पूर्ण करावी तसेच प्रशिक्षण आयोजित करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्यात.

राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी नागपूर विभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा आढावा घेतांना मतदान केंद्रांची संख्या, इलेक्ट्रॉनिक्स मतदान यंत्रांचे नियोजन तसेच मतदान यंत्रांची आवश्यकतेनुसार एकाच प्रकारचे यंत्र उपलब्ध होतील यादृष्टीने विभागीय स्तरावर समन्वय अधिकारीची नियुक्ती करावी तसेच मतदानासाठी आवश्यक मनुष्यबळाची उपलब्धता यावर विशेष लक्ष द्यावे यावेळी त्यांनी सांगितले.

विभागात ४ जिल्हा परिषदा, ५५ नगर परिषदा व नगर पंचायती यांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याच्या दृष्टीने प्रशासनाच्या वतीने पूर्वतयारीचा आढावा सांगतांना विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी म्हणाल्या की, जिल्हा परिषदेसाठी १ जुलै २०२५ च्या मतदार यादीनुसार ४० लाख २३ हजार ०२९ मतदार असून मतदानासाठी ६ हजार ४४१ मतदान केंद्र प्रस्तावित करण्यात आली आहे. या मतदानासाठी ७ हजार २८० कंट्रोल युनिट व १६ हजार २८८ बॅलेट युनिटची आवश्यकता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५५ नगर परिषद व नगर पंचायतीमध्ये १८ लाख १२ हजार १६७ मतदारांची संख्या आहे. यासाठी २ हजार ३७८ मतदान केंद्र राहणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनातर्फे निवडणूक पूर्वतयारीला सुरूवात करण्यात आली आहे.

नागपूर महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ च्या यादीनुसार २४ लाख ८४ हजार २५० मतदार संख्या असून यासाठी ३ हजार १५० मतदान केंद्र प्रस्तावित आहे. मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध राहावे यासाठी महानगर पालिकेतर्फे उपाययोजना करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पारपाडण्यासाठी मतदान यंत्राची उपलब्धता तसेच आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करण्याला प्राधान्य असल्याचे महानगर पालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी यावेळी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी जिल्हानिहाय सादरीकरण करुन स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणुकीसाठी करण्यात येत असलेल्या पूर्वतयारीचे सादरीकरण केले.

रुग्णालयांनी गरजू रुग्णांना शासकीय योजनांचा तत्परतेने लाभ द्यावा : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर



वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : धर्मादाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांनी आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा गरजू रुग्णांना तत्परतेने लाभ देण्याकरिता पुढाकार घ्यावा, या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत न झालेल्या रुग्णालयानी नोंदणी करुन घ्यावी, याकामी राज्य शासनाच्यावतीने सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

यशदा येथे आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार कैलास पाटील, आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, राज्य आरोग्य हमी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, आरोग्य उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, जिल्हा शैल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई यांच्यासह रुग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. आबिटकर म्हणाले, आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने अतिशय महत्वाच्या योजना आहे. धर्मादाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत जिल्ह्यात विविध रुग्णालये नोंदणीकृत असून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना आजारपणाच्या काळात सकारात्मक पद्धतीने मदत करण्याची भावना ठेवावी. त्यांची सेवा करण्याकरिता पुढाकार घेतला पाहिजे.

धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी प्रत्येकी १० टक्के याप्रमाणे एकूण २० टक्के खाटा आरक्षित करणे बंधनकारक असून त्याअनुषंगाने धर्मादाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांनी तत्परतेने काम करावे, शासनाच्या निर्देशाप्रमाणे रुग्णांना खाटा उपलब्ध करुन द्याव्यात.

पुणे जिल्ह्यात रुग्णांची संख्या तसेच वैद्यकीय उपचाराकरिता येणाऱ्या खर्चाचा विचार करता धर्मादाय रुग्णालयाची मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे गरजू रुग्णांना गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, सेवा दिल्यानंतर रुग्णाच्या मनात रुग्णालयाप्रती समाधानाची भावना निर्माण झाली पाहिजे, यादृष्टीने काम करावे, असेही श्री. आबिटकर म्हणाले.

डॉ. शेटे म्हणाले, शासनाच्या आरोग्य विषयक योजनांचा प्रत्येक गरजू रुग्णांना लाभ देण्याकरिता राज्य शासन प्रयत्नशील आहे. त्यामुळे रुग्णालयांनी पात्र रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा देवून सहकार्य करावे, याकामात हलगर्जीपणा होणार नाही, याबाबत रुग्णालय व्यस्थापनाने दक्षता घ्यावी, असेही डॉ. शेटे म्हणाले.

राज्य कामगार विमा रुग्णालयाची पाहणी

पिंपरी-चिंचवड मोहननगर येथील राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयाला आरोग्य मंत्री यांनी भेट देऊन बाहय रुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, औषधी भंडार, आहार कक्षाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. येथील रुग्णांशीही संवाद साधून अडीअडचणी जाणून घेतल्या.

रुग्णांना चांगल्या सेवा सुविधा देण्याकरिता डॉक्टर व प्रशासनानी काळजीपूर्वक लक्ष द्यावे व दर्जेदार सेवा द्याव्यात, अशा सूचना श्री. आबीटकर यांनी केल्या.

विदर्भ, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसरात २५-२६ जुलै रोजी मुसळधार पावसाचा अंदाज

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा निर्माण होत आहे. हा कमी दाबाचा पट्टा २७ जुलैपर्यंत मध्य प्रदेशात सरकण्याचा अंदाज आहे. यामुळे विदर्भात (प्रामुख्याने पूर्व विदर्भात) २५-२६ जुलैदरम्यान मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात देखील मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. विदर्भ लगतच्या पूर्व मराठवाड्यात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो, तर उर्वरित मराठवाडा आणि खानदेशात देखील पावसाचा अंदाज आहे.

पूर्व आणि उत्तर विदर्भात सर्वाधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामध्ये भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अमरावती, आणि यवतमाळ जिल्ह्यांचा समावेश आहे. तसेच कोकणातील सर्वच जिल्हे; नाशिक, पुणे, आणि सातारा जिल्ह्यांतील घाट परिसरात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांमध्ये देखील यादरम्यान मध्यम ते जोरदार पाऊस पडू शकतो. सध्याच्या अंदाजानुसार २६ तारखेला पावसाचे प्रमाण सर्वात अधिक असण्याची शक्यता आहे. २५-२६ जुलै दरम्यान पूर्व विदर्भात धरण साठ्यात वाढ होऊन नदी-नाल्यांना पूर येण्याची शक्यता नाकारता येत नाही; तर विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसरात काही प्रमाणात दरड कोसळणे, आणि सखोल भागांमध्ये पुराची स्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य कर विभागामार्फत बनावट इनपूट टॅक्स क्रेडिट प्रकरणी २०.२० कोटी रुपयांची करचोरी उघड

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर विभागामार्फत मेसर्स सूर्या एंटरप्रायजेस या व्यापार संस्थेविरोधात सुरू असलेल्या तपासाच्या अनुषंगाने एकूण २०.२० कोटी रुपयांच्या बनावट इनपूट टॅक्स क्रेडिट (छऊ) प्रकरणात संस्थेचे मालक निखिल नरेश वालेचा (वय २८ वर्षे) यास अटक करण्यात आली आहे.

ही व्यापार संस्था दि. ८ सप्टेंबर, २०२१ रोजी वस्तू व सेवा कर कायद्यान्वये नोंदणीकृत झाली असून, संबंधित व्यक्तीने कोणतीही वस्तू अथवा सेवा प्रत्यक्षात न प्राप्त करता, तसेच कोणत्याही वस्तूंची देवाण-घेवाण न करता, फसवणूक करणाऱ्या पद्धतीने बनावट बीजकांच्या आधारे छऊ प्राप्त केल्याचे निदर्शनास आले आहे.

तपासादरम्यान व्यापाराच्या



नोंदणीकृत पत्त्यावर भेट दिल्यानंतर असे आढळून आले की, आरोपीने १७.०३ कोटी रुपयांचे बनावट छऊ अस्तित्वात नसलेल्या संस्थांच्या माध्यमातून प्राप्त केले असून, ३.०३ कोटी रुपयांचे अतिरिक्त छऊ चुकीच्या पद्धतीने उएऊ विवरणपत्रांमध्ये दाखविण्यात आले होते. या व्यवहारांसाठी कोणतीही वस्तू अथवा सेवा प्रत्यक्षात प्राप्त झालेली नव्हती.

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, उल्हासनगर यांनी निखिल वालेचा यास दि. ३० जुलै २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. ही कारवाई राज्य वस्तू व सेवा कर विभागामार्फत बनावट बीजक व खोट्या व्यवहारांद्वारे केली जाणारी करचोरी यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने सुरू करण्यात आलेल्या विशेष तपास मोहिमेअंतर्गत करण्यात आली. कारवाई राज्यकर सहायक आयुक्त संतोष लोंढे, कर अधिकारी दीप्ती पिलारे, सुजीत कक्कड, संतोष खेडकर तसेच निरीक्षक व कर सहाय्यक यांच्या विशेष पथकाच्या मदतीने करण्यात आली.

संपूर्ण तपास राज्यकर सह आयुक्त (अन्वेषण-क), मुंबई यांच्या आदेशानुसार व राज्यकर उपआयुक्त यास्मीन अजीम मोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आला. ही कारवाई चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील राज्य जीएसटी विभागाची पाचवी अटक असून, करचोरी, बनावट बीजक निर्मिती, खोट्या उलाढाली दाखविणे व बेकायदेशीरपणे छऊ मिळविणे अथवा हस्तांतरित करणे यांच्याविरोधात विभागाने कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना गतवैभव प्राप्त होण्यासाठी प्रयत्न करावेत : कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा

वृत्तसंस्था ■ सातारा



सातारा : औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी मांडलेल्या प्रश्नाबाबत शासन सकारात्मक असून तुमचे प्रश्न तातडीने मार्गी लावले जातील, अशी ग्वाही कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले. यावेळी त्यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे गतवैभव पुन्हा प्राप्त होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे, असे निर्देशही दिले.

एमआयडीसी येथील मास भवन येथे सर धनाजीशा कूपर सभागृहात कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण संचालनायातील प्राचार्य व कर्मचाऱ्यांचा जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मंत्री श्री. लोढा बोलत होते. या जनसंवाद कार्यक्रमास आमदार मनोज घोरपडे, कौशल्य विभागाच्या उपायुक्त अनुपमा पवार, कौशल्य विभागाचे सहायक आयुक्त सुनिल पवार, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य संजय मांगलेकर, प्रिया शिंदे, विक्रम पावसकर आदी उपस्थित होते.

विविध संस्थांच्या व शासनाच्या माध्यमातून राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या सोयी-सुविधांसाठी मोठा निधी उपलब्ध झाला आहे, असे सांगून मंत्री श्री. लोढा म्हणाले, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये राज्यातील प्रत्येक तरुण तरुणींना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मोठ्या जर्मन शेडची उभारणी करण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी बाह्यस्थ प्रशिक्षकांरोबर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिक्षकांची मदत घेण्यात येणार आहे. या शिक्षकांना वाढीव मानधही देण्यात येणार आहे. यातून युवक रोजगारक्षम झाला पाहिजे ही शासनाची भूमिका आहे.

अनेक वर्षापासून ताशी मानधन तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांची लवकरच परीक्षा घेण्यात येणार आहे. जे शिक्षण परीक्षेत पास होतील त्यांना जागी कायम स्वरुपी ठेवण्यात येईल. जनसंवाद कार्यक्रमामध्ये देण्यात आलेल्या निवेदन व प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही मंत्री लोढा यांनी दिली.

जनसंवाद कार्यक्रमामध्ये मांडण्यात आलेल्या प्रत्येक प्रश्न मंत्री महोदय सकारात्मक विचार करतील, अशी अपेक्षा आमदार श्री. घोरपडे यांनी व्यक्त केली.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शन कार्यक्रम जिल्ह्यात लोकांमध्ये प्रभवीपणे पोहचवावा : कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा

वृत्तसंस्था ■ सातारा



सातारा : पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शन कार्यक्रम जिल्ह्यात प्रभवीपणे पोहचविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सर्व जिल्हास्तरीय समित्यांनी समाजातील शेवटच्या घटकाच्या विकासाचा विचार तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे निर्देश कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शनाचा लोक कल्याणकारी विचार युवापिढी पर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि राज्यातील युवा वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यस्तरावर तसेच जिल्हास्तरावर एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी समितीच्या कामाचा आढावा घेतला . ?डिशनल एमआयडीसी सातारा येथील मास भवन या ठिकाणी झालेल्या या बैठकीस आमदार मानोज घोरपडे, अप्पर जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने, पोलीस उपअधीक्षक अतुल सबणीस, कौशल्य विभागाच्या उपायुक्त अनुपमा पवार, जिल्हा कौशल्य विकास अधिकारी सुनिल पवार, उद्योग विभागाचे सहसंचालक चंद्रकांत ढेकणे, प्रिया महेश शिंदे, विक्रम पावसकर, अशासकीय सदस्य, विविध विभागांचे शासकीय अधिकारी उपस्थित होते .

यावेळी मंगलप्रभात लोढा म्हणाले, पंडित दिनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शन संकल्पना, त्यांचे जीवन कार्य विचारप्रणाली समाजासमोर जावी यासाठी राज्यस्तरावर तसेच जिल्हास्तरावरती समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. त्यांतर्गत विविध उपक्रम राबविण्याचे शासनाचे निर्देश आहेत. यामध्ये महाविद्यालय स्तरावर, शाळा व विविध मंडल स्तरावर, आश्रमशाळा, अंगणवाड्या अशा सर्व स्तरावर एकात्म मानव दर्शन विषयक निबंध, वक्तृत्व, पोस्टर, प्रश्नमंजुषा कथकाथन स्पर्धा, परिसंवाद असे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. पंडित दिनदशळ उपाध्याय यांचे कार्यविचार प्रणाली यांची माहिती शालेय विद्यार्थी, कामगार, महिला, शेतकरी आदी सर्व घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी १ लाख पुस्तके प्रकाशित करुन त्यांचे वितरण करण्यात यावे. त्यासाठी जिल्हा नियोजन मधील निधी उपयोगात आणावा. येणाऱ्या गणेशोत्सवामध्येही गणेश मंडळांच्या माध्यमांतून लोकांमध्ये याबद्दल माहितीचा प्रसार करण्यात यावा.

महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर विभागाची कारवाई ; रु. ९.१९ कोटींच्या बनावट इनपूट टॅक्स क्रेडिट प्रकरणी दोन आरोपींना अटक

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई, : राज्य शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागामार्फत बोगस बिलिंग प्रकरणी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मे. ॲक्युरेट एंटरप्रायजेस या भागीदारी व्यवसायाविरुद्ध तपासात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाई दरम्यान बनावट खरेदी दाखवून वस्तू व सेवा करांतर्गत खोटी कर सवलत (इनपुट टॅक्स क्रेडिट) घेऊन सुमारे रुपये ९.१९ कोटींची महसूल हानी करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

या प्रकरणी जबाबदार व्यक्ती त्रिभुवन सिन्हा (वय ५०) आणि अख्तर खान (वय ५५) यांना दिनांक २१ जुलै २०२५ रोजी अटक करण्यात आली असून, अप्पर मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांनी त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई सहायक राज्यकर आयुक्त चंदर कांबळे, दादासाहेब शिंदे, राजेश बदर (अन्वेषण 'अ', मुंबई) यांनी राज्यकर सहआयुक्त (भा.प्र.से.) प्रेरणा देशभ्रतार आणि राज्यकर उपायुक्त अनिल कुदळे यांच्या मार्गदर्शनाखाली केली. या कारवाईत राज्यकर निरीक्षकांचे विशेष सहकार्य लाभले.

राज्य वस्तू व सेवा कर विभागाने सर्वसमावेशक नेटवर्क विश्लेषण साधने वापरून आणि अन्य संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत अशा प्रकारच्या करचुकवेगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांविरोधात कठोर कारवाई सुरू ठेवली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ही सहावी आणि सातवी अटक आहे.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242